RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

२८ शनिवार फेब्रुवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २७४

✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी? मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!

१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!

कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.

घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:

9975532291/9096945629

## 'आप'च्या 23 नेत्यांची निर्दोष मुक्तता; अकोल्यात जल्लोष

**▸विदर्भ केसरी। अकोला**

राजधानी दिल्लीतील मद्य धोरण घोटाळा प्रकरणात मोठी घडामोड घडली असून न्यायालयाने आम आदमी पक्षाच्या 23 नेत्यांची निर्दोष मुक्तता केली आहे. या निर्णयाचे आम आदमी पक्षाचे राज्याचे महासचिव अरविंद कांबळे यांच्या नेतृत्वाखाली अकोल्यात पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत निकालाचे स्वागत केले. "अखेर सत्याचा विजय झाला आहे. केजरीवाल आणि सिसोदिया हे भ्रष्टाचारी नसून इमानदार आहेत," अशा शब्दांत भावना व्यक्त करण्यात आल्या.

## कारंजा तालुयात भेसळयुक्त दुधाची खुलेआम विक्री

**▸विदर्भ केसरी। कारंजा लाड,**

तालुयात सध्या भेसळयुक्त दुधाच्या विक्रीचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत आहे. शहरात आणि ग्रामीण भागात लहान-मोठ्या दूध डेअऱ्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, त्यातील गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव चिंताजनक आहे. नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या या अन्नपदार्थात जर भेसळ होत असेल, तर ती केवळ फसवणूक नसून समाजाविरुद्धचा गुन्हाच आहे. दूध हे लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांच्या आहारातील अत्यावश्यक घटक आहे. मात्र अधिक नफा मिळविण्याच्या हव्यासापोटी काही विक्रेते दुधात पाणी, स्टार्च, डिटर्जंटसदृश रसायने किंवा कृत्रिम पावडर मिसळत असल्याच्या तोंडी तक्रारी समोर येत आहेत. अशा प्रकारच्या भेसळीमुळे पोटाचे विकार, अन्नविषबाधा, किडनीचे आजार आणि लहान मुलांच्या वाढीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. शहरात दूध डेअरींची संख्या वाढणे ही स्पर्धात्मक दृष्टिकोनातून सकारात्मक बाब असली, तरी त्या डेअरीची नोंदणी, परवाने, नियमित तपासणी आणि प्रयोगशाळा चाचण्या होत आहे का? हा प्रश्न अनुत्तरित आहे. संबंधित अन्न व औषध प्रशासन विभागाने केवळ अधूनमधून कारवाई करून समाधान मानू नये तर नियमित नमुना तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करावी. दूध खरेदी करताना बिल घेणे, संशयास्पद चव, वास किंवा घट्टपणा जाणवल्यास तक्रार नोंदवणे, तसेच अधिकृत ब्रँड किंवा प्रमाणित विक्रेत्यांकडूनच खरेदी करणे ही काळाची गरज आहे.

## कांद्याला प्रति क्विंटल 500 रुपये अनुदान द्या - भुजबळ

**▸विदर्भ केसरी।**

मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना एकही प्रति क्विंटल 500 रुपये अनुदान देण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या अत्यंत बिकट परिस्थितीचा सामना करत आहेत. कांदा पिकासाठी प्रति क्विंटल सुमारे १,५०० रुपये उत्पादन खर्च येत असताना बाजारभाव मात्र ५०० रुपयांखाली घसरले आहेत. जानेवारीपासून सुमारे १,००० रुपयांवर स्थिर असलेले दर अचानक कोसळल्यामुळे आणि बेमोसमी पावसामुळे बळीराजा गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. उत्पादन खर्चापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला असून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. सन २०२३ मध्ये शासनाने कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल ३५० रुपये अनुदान दिले होते; मात्र सध्याची परिस्थिती त्यापेक्षाही अधिक चिंताजनक आहे.

# मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा मिळवून पुढील पिढीपर्यंत नेऊया

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रम

**▸विदर्भ केसरी। मुंबई,**

**जगात ज्या भाषा ज्ञानभाषा बनतात त्या पुढे प्रवाहित होतात. ज्या भाषेतून व्यवहार, शिक्षण आणि रोजगाराची संधी निर्माण होते, तीच भाषा समाजात प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे अभिजात मराठीला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध मराठी पुढील पिढीपर्यंत पोहोचवूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**



विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विधान परिषद सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उपसभापती नीलम गोéहे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रशासनात मराठीचा वापर रूजवताना भाषेचे शुद्धीकरण करण्यासाठी शब्दकोश तयार केला. फारशी व अरबी भाषेच्या प्रभावातून मराठीला स्वाभिमानाने उभे करण्याचे कार्य त्यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान याच परंपरेतून पुढे आला असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे तिच्या संवर्धनाला नवी दिशा मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. मराठी साहित्य, लोककला आणि सांस्कृतिक वारसा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

### जावे विनोदाच्या गावा' कार्यक्रमात साहित्य-कलांचा संगम

- **कार्यक्रमात विनोदी कविता, विडंबन गीत आणि मराठी अभिमान गीतांचे सादरीकरण झाले. कविवर्य सुरेश भट लिखित आणि कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेले 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे गीत सादर करण्यात आले.**
- **अभिनेते ऋषिकेश जोशी यांनी पु. ल. देशपांडे यांच्या लेखाचे वाचन केले, तर दिग्दर्शक केदार शिंदे यांनी जयवंत दळवी लिखित लेख तसेच मंगेश पाडगावकर यांच्या कवितेचे वाचन केले. वि. दा. करंदीकर लिखित 'साठीचा गजर' ही कविता सादर करण्यात आली.**

### मराठीला जोजगाराची आणि जागतिक व्यवहाराची भाषा बनवू- एकनाथ शिंदे

- **मराठी ही केवळ संस्कृतीची नव्हे तर अर्थकारण, रोजगार आणि जागतिक व्यवहाराचीही भाषा व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. माझ्या रक्तात मराठी, माझ्या श्वासात मराठी, असे भावनिक उद्गार काढत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनी माय मराठीचा वारसा अधिक जोमाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. मराठीचा झेंडा सातासमुद्रापार फडकत ठेवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.**

### डिजिटल माध्यमांत मराठीचा वापर वाढवूया - पवार

- **तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल माध्यमांवर मराठीचा अधिकाधिक वापर करण्याची गरज अधोरेखित केली. लंडनमध्ये प्रस्तावित महाराष्ट्र भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगत त्यांनी मराठीच्या जागतिक प्रसारासाठी प्रयत्न सुरू असल्याचे नमूद केले. सार्वजनिक ग्रंथालयांना वाढीव अनुदान देण्यात आल्याची माहितीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी दिली.**

# धान उत्पादक धडकले जिल्हाकचेरीवर



**▸विदर्भ केसरी। भंडारा :**

धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात आज भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

विशेष म्हणजे या मोर्चात काँग्रेसचे खा. प्रशांत पडोळे सहभागी झाले होते. जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांनी या मोर्चात सहभागी होत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. भारतीय किसान संघाच्या वतीने काही दिवसांपूर्वी प्रत्येक तालुका स्तरावर तहसीलदारांना निर्वळदन देऊन शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात यावे अशी मागणी केली होती. विशिष्ट मुदतीत या संदर्भात निर्णय न झाल्यास मोर्चा काढण्याचे स्पष्ट करण्यात आले होते. दरम्यान आज 27 फेब्रुवारी रोजी भंडारा शहरातील हुतात्मा स्मारक येथून शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात आला. गांधी चौक, पोस्ट ऑफिस चौक या मार्गाने मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचला. त्या ठिकाणी मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. Bharatiya Kisan Sangh Andolan भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र पांडे, महामंत्री दिनेश कापगते यांच्यासह भंडाऱ्याचे काँग्रेसचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आधारभूत धान खरेदी केंद्र संस्था चालक संघाचे अध्यक्ष नेपाल रंगारी यांच्यासह अनेक जण आंदोलनात सहभागी झाले होते.

# मद्य घोटाळ्याच्या आरोपातून केजरीवालांसह २२ जणांची निर्दोष मुक्तता

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याच्या आरोपातून राऊज एवेन्यू कोर्टाने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह २२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या घोटाळ्याच्या आरोपात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, विजय नायर यांच्यासह इतरांवर गंभीर आरोप झाले होते. मात्र या सर्व आरोपातून कोर्टाने निर्दोष मुक्तता केल्यानं अरविंद केजरीवाल यांच्या डोळयात अश्रू आले. मोदी-शाह यांनी षडयंत्र रचले आणि आम्हाला भ्रष्टाचारी ठरवले होते असा आरोप केजरीवाल यांनी केला.

कोर्टाने आरोपातून निर्दोष मुक्तता केल्यानंतर अरविंद केजरीवाल भावूक झाले. अरविंद केजरीवाल म्हणाले की, सत्येचा विजय होतो हे आम्ही कायम म्हणत होतो. आमचा भारतीय न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे. न्यायाधीशांनी आम्हाला न्याय दिला. सत्याचा विजय झाला आहे. आम आदमी पक्षाला संपवण्यासाठी नरेंद्र मोदी-अमित शाह यांनी मिळून सर्वात मोठे षडयंत्र रचले. आमच्या नेत्यांना जेलमध्ये टाकले गेले. विद्यमान मुख्यमंत्र्यांना घरातून बाहेर काढत ६ महिने जेलमध्ये ठेवले. उपमुख्यमंत्र्यांना २ वर्ष जेलमध्ये ठेवले. हे सगळे खोटे गुन्हे होते.

आम्हाला भ्रष्टाचारी ठरवण्यात येत होते असं सांगताना अरविंद केजरीवाल यांच्या डोळ्यात अश्रू आले. तर मी भ्रष्ट नाही. मी माझ्या प्रामाणिकपणाने जीवन जगतोय. आमच्यावर खोटे आरोप लावले परंतु आज कोर्टात सिद्ध झाले. अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया असो आम आदमी पक्ष हा प्रामाणिक आहे. सत्तेसाठी पंतप्रधानांनी देशाशी खेळू नये. संविधानाशी खेळू नका. तुम्हाला सत्ता हवी तर चांगली कामे करा. आज देशासमोर कित्येक प्रश्न आहे. महागाई, बेरोजगारी त्याशिवाय देशात रस्त्यांची दुरावस्था आहे. सगळीकडे प्रदुषण आहे. चहुबाजूने देशात वेगवेगळ्या समस्या आहेत. त्या समस्यांचे निवारण करून सत्ता मिळवा. केजरीवाल आणि आम आदमी पक्षावर खोटे आरोप का करता असा सवालही केजरीवाल यांनी उपस्थित केला.

# IAS एम. देवेंद्र सिंग निलंबित!

**▸विदर्भ केसरी।**

मुंबईत सध्या राज्य सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने विविध विभागांच्या बैठकांचा आणि नियोजनाचा धडाका सुरू आहे. याच दरम्यान, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक आणि ब्रीफिंग बोलावले होते. मात्र, मंत्र्यांचे स्पष्ट आदेश असतानाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आणि 2011 च्या बॅचचे आयएएस अधिकारी एम. देवेंद्र सिंग या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. मंत्र्यांच्या ब्रीफिंगला दांडी मारणे आणि शासकीय कामात कसूर करणे ही बाब गंभीर मानत अखेर त्यांच्यावर निलंबनाची कुऱ्हाड कोसळली आहे.

या प्रकरणाची विधानसभेत दखल घेण्यात आली असून तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी संबंधित अधिकाऱ्याच्या निलंबनाचे निर्देश दिले होते. त्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाने एम. देवेंद्र सिंग यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करत त्यांना तत्काळ निलंबित केले आहे. अतिरिक्त सचिव व्ही. राधा यांच्या स्वाक्षरीने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. वरिष्ठ सनदी अधिकाऱ्याने मंत्र्यांच्या आदेशांकडे दुर्लक्ष केल्यामुळे झालेल्या या थेट कारवाईमुळे सध्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र शासनाने 'अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, 1969' मधील नियम 3 च्या उपनियम (1) च्या कलम (अ) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग (IAS, 2011 बॅच) यांना तत्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. या निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय मुंबई येथे निश्चित करण्यात आले असून, कोकण विभागाच्या विभागीय आयुक्तांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, या काळात त्यांना कोणत्याही खासगी नोकरी, व्यापार किंवा व्यवसायात सहभागी होता येणार नाही. निलंबन काळात एम. देवेंद्र सिंग यांना नियमानुसार निर्वाह भत्ता, महागाई भत्ता व इतर भत्ते देय असतील. मात्र त्यासाठी त्यांना आपण कोणत्याही खासगी नोकरी, व्यवसाय किंवा उपजीविकेच्या साधनामध्ये गुंतलेले नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. या अटींचे उल्लंघन केल्यास ते गंभीर गैरवर्तन मानले जाईल आणि त्यांच्यावर अधिक कडक शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा सज्जड इशाराही शासनाने या आदेशाद्वारे दिला आहे. अतिरिक्त सचिव व्ही. राधा यांच्या स्वाक्षरीने ही कारवाई करण्यात आली असून यामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# बसची ट्रेलरशी टक्कर, ६ प्रवाशांचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। बालोत्रा,**



जिल्ह्यातील सारवाडी गावाजवळ शुक्रवारी राष्ट्रीय महामार्गावर एक भीषण रस्ता अपघात घडला. जोधपूरहून सांचोरला जाणारी एक स्लीपर बस ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करत असताना ट्रेलरला धडकली.

धडक इतकी भीषण होती की बसच्या चालकाच्या बाजूला मोठे नुकसान झाले आणि सहा प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. काही मृतदेह बसला लटकलेले दिसले, ज्यामुळे घटनास्थळी गोंधळ उडाला.

प्रत्यक्षदर्शींच्या मते, कल्याणपूरजवळील सारवाडी गावात हा अपघात झाला. धडकेनंतर महामार्गावर वाहनांच्या लांब रांगा लागल्या. माहिती मिळताच स्थानिक पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि बचावकार्य सुरू केले. जखमींना रुग्णवाहिका आणि खाजगी वाहनांनी बालोत्रा येथील सरकारी रुग्णालयात नेण्यात आले, तर सहा मृतदेह नाहाटा रुग्णालयातील शवागारात ठेवण्यात आले आहेत. गंभीर जखमी झालेल्या सात प्रवाशांना ग्रीन कॉरिडॉरद्वारे जोधपूर येथील मथुरा दास माथुर रुग्णालयात पाठवण्यात आले. पोलिसांनी ट्रेलर चालकाला ताब्यात घेतले आहे आणि तपास सुरू केला आहे. मृतांची ओळख पटवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

बालोत्राचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक हरफूल सिंग म्हणाले, "सरवाडी गावाजवळ एका बसने पुढे जाणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्याने सहा जणांचा मृत्यू झाला." सरवाडी गावाजवळ राष्ट्रीय महामार्गावर स्लीपर बसने पुढे जाणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्याने हा अपघात झाला. अधिकाऱ्यांच्या मते, हा अपघात भीषण होता आणि बसचे मोठे नुकसान झाले.

राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा यांनीही अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले. मुख्यमंत्री भजन लाल शर्मा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर पोस्ट केले. त्यांनी लिहिले की, "बालोत्राच्या सारवाडी येथे राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण रस्ते अपघाताची बातमी अत्यंत दुःखद आहे. मी स्थानिक प्रशासनाला बचावकार्य करण्याचे आणि जखमींना योग्य उपचार देण्याचे निर्देश दिले आहेत. शोकाकुल कुटुंबांसोबत माझ्या मनःपूर्वक संवेदना आहेत. देव मृतांच्या आत्म्यांना शांती देवो आणि जखमींना लवकर बरे होवो. ओम शांती!"

# बाळ विक्री प्रकरणाच्या तपासासाठी 'SIT' गठीत

## परराज्यातही काळ्या बाजाराचे धागेदोरे : मुख्य आरोपी डॉ. नितेश बाजपेयीसध्या पोलीस कोठडीत

**▸विदर्भ केसरी। भंडारा :**



भंडारा जिल्ह्यात खळबळ माजवणाऱ्या नवजात बाळ विक्री प्रकरणाचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना केली आहे. साकोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापुरे यांच्या नेतृत्वाखाली हे ९ जणांचे पथक आता या रॅकेटची पाळेमुळे खोदून काढणार आहे.

सुमारे १५ दिवसांपूर्वी वरठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले होते. तपासादरम्यान पोलिसांनी अशाच प्रकारे विकल्या गेलेल्या आणखी एका नवजात बाळाचा शोध लावून त्याला आपल्या ताब्यात घेतले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. नितेश बाजपेयी (वय ३४) सध्या पोलीस कोठडीत असून, त्याच्या रुग्णालयातील संशयास्पद हालचालींची कसून चौकशी केली जात आहे.

या प्रकरणाची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता असल्याने स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीमध्ये ३ अधिकारी आणि ६ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या पथकाचे नेतृत्व शिवम विसापुरे (उपविभागीय पोलीस अधिकारी, साकोली) यांच्याकडे देण्यात आले आहे. तसेच सपोनि विवेक सोनवणे, प्रतिभा राऊत, अजय मडावी यासह ६ कार्यक्षम पोलीस कर्मचारी या मोहिमेत सहभागी आहेत.

मुख्य आरोपी डॉ. बाजपेयी याला न्यायालयाने ४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासात धक्कादायक बाब समोर आली आहे की, डॉ. बाजपेयी यांच्या रुग्णालयात केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर इतर राज्यांतूनही मोठ्या प्रमाणावर रुग्ण येत असत. त्यामुळे या बाळ विक्रीच्या काळ्या बाजाराचे धागेदोरे परराज्यातही पसरले आहेत का? याचा तपास आता एसआयटी करणार आहे.

- **'नवजात बाळांच्या विक्रीचे हे प्रकरण अत्यंत गंभीर असून, यात सहभागी असलेल्या कोणत्याही गुन्हेगाराला सोडले जाणार नाही. एसआयटीच्या माध्यमातून आम्ही या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश करू.'**
- **-नुरुल हसन, जिल्हा पोलीस अधीक्षक, भंडारा.**

# इंग्लंडचा दिमाखदार विजय

## ▸▸| किवींचे पंख छाटले!

**▸विदर्भ केसरी। कोलंबो :**

टी-२० विश्वचषक २०२६ च्या 'सुपर-८' फेरीतील थरारक लढतीत इंग्लंडने न्यूझीलंडचा ४ विकेट्स आणि ३ चेंडू राखून पराभव केला. आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या या सामन्यात फिरकीपटूंच्या फिरकीनंतर विल जॅक्स आणि रेहान अहमद यांच्या तुफानी फलंदाजीच्या जोरावर इंग्लंडने न्यूझीलंडचे आव्हान धुळीस मिळवले.

टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा न्यूझीलंडचा निर्णय इंग्लंडच्या गोलंदाजांनी चुकीचा ठरवला. सलामीवीर टिम सेफर्ट (३५) आणि फिन ॲलन (२९) यांनी आक्रमक सुरुवात केली खरी, पण मधल्या फळीतील फलंदाजांना इंग्लंडच्या फिरकीसमोर नांग्या टाकाव्या लागल्या. इंग्लंडच्या विल जॅक्स (२/२३), आदिल रशीद (२/२८) आणि रेहान अहमद (२/२८) या त्रिकुटाने किवी फलंदाजांना ठराविक अंतराने बाद करून धावगतीवर अंकुश ठेवला. न्यूझीलंडला २० षटकांत ७ बाद १५९ धावांपर्यंतच मजल मारता आली. १६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. कर्णधार जोस बटलर (०) आणि फिल सॉल्ट (२) स्वस्तात परतल्याने इंग्लंडची अवस्था २ बाद २ अशी बिकट झाली होती. हॅरी ब्रूक (२६), टॉम बँटन (३३) आणि सॅम करन (२४) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण राचिन रवींद्रने ३ बळी घेत सामन्यात रंगत आणली. इंग्लंडचा संघ ११७ वर ६ बाद अशा संकटात असताना मैदानात विल जॅक्स आणि रेहान अहमदची जोडी जमली.

दैंनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ 

अग्रलेख

## मराठी भाषा गौरव

२७ फेब्रुवारी हा दिवस मराठी समाजाच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेत केवळ औपचारिक उत्सव म्हणून नोंदला गेलेला नाही, तर तो आपल्या भाषिक आत्मभानाचा, स्मृतिधनाचा आणि अस्मितेच्या सातत्याचा साक्षीदार आहे. मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना आपण एका अर्थाने स्वतःकडे म्हणजेच आपल्या बोलण्यात, विचारात, संवेदनांत आणि सामाजिक वर्तनात खोलवर रुजलेल्या भाषेकडे पाहतो. भाषा ही फक्त संवादाचे साधन नसते; ती समाजाची सामूहिक स्मृती असते. पिढ्यान्‌पिढ्यांचे अनुभव, श्रम, आनंद, दुःख, संघर्ष, स्वप्ने आणि मूल्ये शब्दांच्या रूपाने भाषेत साठलेली असतात. मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या भूमीशी, लोकजीवनाशी आणि इतिहासाशी घट्ट बांधलेली आहे. म्हणूनच तिचा गौरव म्हणजे आपल्या अस्तित्वाचा गौरव आहे. मराठी भाषेचा इतिहास हा हजारो वर्षांचा, अनेक टप्प्यांतून गेलेला प्रवास आहे. प्राचीन महाराष्ट्री प्राकृतपासून सुरू झालेली ही भाषा अपभ्रंशाच्या अवस्थेतून पुढे जात लोकभाषा म्हणून विकसित झाली. प्रारंभी मराठी भाषा ही सामान्य जनतेच्या दैनंदिन व्यवहाराची भाषा होती. शेतकरी, कष्टकरी, कारागीर, व्यापारी, स्त्रिया सगळ्यांच्या जीवनात ही भाषा सहजपणे मिसळलेली होती. तिच्या शब्दसंपत्तीतून लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटते. म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, ओव्या, पोवाडे यांमधून मराठी भाषेने लोकसंस्कृती जपली आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली. संत परंपरेने मराठी भाषेला एक नवे वळण दिले. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'च्या माध्यमातून संस्कृतमधील गहन तत्त्वज्ञान मराठी भाषेतून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले. हा क्षण मराठी भाषेच्या इतिहासातील क्रांतिकारक टप्पा मानला जातो. ज्ञानेश्वरांनंतर नामदेव, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास यांसारख्या संतांनी मराठी भाषेला अध्यात्मिक उंची दिली. त्यांच्या अभंगांमधून मराठी भाषा ही भक्तीची, समतेची आणि करुणेची भाषा बनली. जातीभेद, अहंकार आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध संतसाहित्याने मराठी भाषेतून मानवी मूल्यांचा संदेश दिला. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ धार्मिक अभिव्यक्तीची भाषा न राहता, ती समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनली. मध्ययुगीन काळात मराठी भाषेने राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातही आपले स्थान निर्माण केले. स्वराज्यनिर्मितीच्या काळात मराठी भाषेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. राज्यकारभार, दप्तरी व्यवहार आणि न्यायनिवाड्यात मराठी भाषेचा वापर करून भाषिक स्वाभिमान अधोरेखित करण्यात आला. त्या काळात मराठी भाषा ही केवळ साहित्यिक किंवा धार्मिक मर्यादेत न राहता, ती सत्तेची, नीतीनिर्मितीची आणि लोककल्याणाची भाषा बनली. भाषा आणि सत्ता यांचे नाते लोकाभिमुख झाले; मराठी भाषा जनतेशी थेट संवाद साधणारी ठरली. ब्रिटिश राजवटीच्या काळात मराठी भाषेने नवजागरणाचा अनुभव घेतला. मुद्रणयंत्राच्या आगमनामुळे वृत्तपत्रे, मासिके आणि पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होऊ लागली. समाजसुधारकांनी मराठी भाषेतून लोकांशी संवाद साधला आहे. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या विषयांवर मराठी भाषेतून निर्भीड लेखन झाले आहे. मराठी भाषा ही परिवर्तनाची भाषा बनली. समाजमन ढवळून काढणारी, प्रश्न विचारणारी आणि नव्या मूल्यांची जाणीव करून देणारी भूमिका तिने बजावली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही मराठी भाषेने जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्याने अनेक नवे प्रवाह अनुभवले. ग्रामीण साहित्याने खेड्यातील जीवन, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ग्रामीण संस्कृतीचे वास्तव मांडले. दलित साहित्याने सामाजिक विषमतेचे कटू वास्तव उघड केले आणि वंचितांच्या आवाजाला शब्द दिले. स्त्रीवादी लेखनाने स्त्रियांच्या अनुभवांना, वेदनांना आणि संघर्षांना अभिव्यक्ती दिली. आदिवासी साहित्याने मुख्य प्रवाहाबाहेरील समाजजीवन मराठी भाषेतून मांडले. या सर्व प्रवाहांमुळे मराठी भाषा अधिक व्यापक, समावेशक आणि लोकाभिमुख बनली आहे. आज मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना वर्तमानकाळातील आव्हानेही समजून घेणे आवश्यक आहे. जागतिकीकरण, शहरीकरण आणि इंग्रजी भाषेचे वाढते प्राबल्य यामुळे मातृभाषेच्या वापरावर मर्यादा येत आहेत. अनेक कुटुंबांत मुलांशी मराठीत संवाद कमी होत आहे. सार्वजनिक फलक, जाहिराती आणि कार्यालयीन व्यवहारांमध्ये मराठी भाषेला दुय्यम स्थान दिले जात असल्याची उदाहरणे दिसतात. ही परिस्थिती मराठी भाषेच्या भविष्यासाठी चिंताजनक आहे, हे नाकारता येणार नाही. तथापि, या आव्हानांबरोबरच काही आशादायक बदलही दिसून येतात. डिजिटल युगात मराठी भाषेला नवे व्यासपीठ मिळाले आहे. सोशल मीडिया, ब्लॉग्स, पॉडकास्ट्स आणि व्हिडिओ माध्यमांद्वारे मराठी भाषेतून मोठ्या प्रमाणावर आशयनिर्मिती होत आहे. तरुण पिढी मराठी भाषेतून कविता, कथा, सामाजिक भाष्य, इतिहास, विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक लेखन करताना दिसत आहे. ही बाब मराठी भाषेच्या सर्जनशील क्षमतेचे द्योतक आहे. मराठी भाषेचा प्रवास केवळ ऐतिहासिक कालखंडांपुरता मर्यादित नसून तो सातत्याने बदलणाऱ्या समाजजीवनाशी जोडलेला आहे. मध्ययुगीन भक्तीपरंपरेनंतर मराठीने जेव्हा पेशवाई, इंग्रजी राजवट आणि नंतर स्वातंत्र्योत्तर काळ अनुभवला, तेव्हा तिच्या आशयात, अभिव्यक्तीत आणि शैलीत आमूलाग्र परिवर्तन घडत गेले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेवांच्या आध्यात्मिक भाषेपासून ते महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचारांपर्यंत मराठीने समाजमन घडवण्याचे कार्य केले.

# मेळघाटात गुंजणार बच्चू कडूंचा आवाज

### मेळघाटात २५० किमी करणार पदयात्रा

**▸विदर्भ केसरी। निलेश फाटकर अमरावती**



मेळघाट व दुर्गम भागातील शेतकरी, आदिवासी आणि मजूर वर्गाच्या वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी आमदार बच्चू कडू यांनी मेळघाटात २५० किलोमीटरची पदयात्रा काढण्याची घोषणा केली आहे. ही पदयात्रा एक मार्च ते नऊ मार्च पर्यंत चालणार आहे. ही पदयात्रा केवळ आंदोलन नसून, मेळघाटातील वास्तव परिस्थितीचा थेट आढावा घेत सरकारला जाब विचारण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या संदर्भात त्यांनी परिपत्रक जारी करत पदयात्रेची भूमिका आणि प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.

मेळघाट व दुर्गम भाग आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असून शेतकरी कर्जबाजारीपणा, रोजगाराचा अभाव, आरोग्य व शिक्षणाच्या सुविधांची दयनीय अवस्था, वीज, पाणी, रस्ते आणि मोबाईल नेटवर्कचा अभाव यामुळे नागरिकांचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. सरकारने ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले असताना अद्यापही कोणतीही ठोस अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे १५ मार्च २०२६ पर्यंत कर्जमाफीस पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करावी तसेच दुष्काळ, नापिकी आणि हमीभाव न मिळाल्याने २०२५-२६ चालू वर्षाचीही अतिरिक्त कर्जमाफी द्यावी, अशी ठाम मागणी बच्चू कडू यांनी केली आहे. याबाबत २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत शासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, असेही त्यांनी नमूद केले.

मेळघाट व दुर्गम भागात मनरेगा अंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे मंजूर असतानाही प्रत्यक्षात विकासकामे रखडलेली आहेत. शेतीसाठी १०० टक्के अनुदानावर चेन फेंसिंग व सोलर बसविणे, मजुरांचे पैसे एका आठवड्याच्या आत थेट खात्यात जमा करणे आणि उशीर झाल्यास व्याज देणे, अशी मागणी त्यांनी केली आहे. ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत मागेल त्याला काम देण्याचा पाच वर्षांचा आराखडा तयार करावा, ऑनलाईन हजेरीची अट रद्द करून नेटवर्कअभावी ऑफलाईन हजेरी सुरू करावी, अतिरिक्त अधिकारी-कर्मचारी नेमावेत, रोजगार सेवकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा देऊन समान काम समान वेतन लागू करावे तसेच कंत्राटी भरती प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

मेळघाटात मानव-वन्यप्राणी संघर्ष दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांचा जीव अक्षरशः दोन्ही बाजूंनी धोक्यात आला आहे. २०२० मध्ये वाघांच्या हल्ल्यात ३१ जणांचा मृत्यू झाला होता, तर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ६१ नागरिकांचा मृत्यू आणि ६४८ जण जखमी झाल्याची नोंद आहे. या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय स्वतंत्र धोरण तयार करणे, जलद प्रतिसाद पथक स्थापन करणे, एआय कॅमेरे व संरक्षण व्यवस्था उभारणे आणि वन्यप्राणी हल्ल्यात मृत्यू झाल्यास ५० लाख, कायम दिव्यांगत्वास २५ लाख, गंभीर जखमेस १५ लाख, उपचारासाठी १ लाख तसेच जनावरांच्या मृत्यूसाठी १ लाख रुपये नुकसानभरपाई देऊन ती आठ दिवसांत न दिल्यास व्याज देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

मेळघाटातील अनेक गावांमध्ये स्वातंत्र्यानंतरही वीज पोहोचलेली नाही. अद्याप अंधारात असलेल्या गावांमध्ये तात्काळ वीजपुरवठा सुरू करावा, स्मार्ट मीटर काढून पारंपरिक मीटर बसवावेत आणि नादुरुस्त सौर कृषीपंप दुरुस्त न होत असल्याने पारंपरिक विद्युत जोडण्या द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली. शिक्षण क्षेत्रात जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त शिक्षक पदे तात्काळ भरावीत, संगणक व क्रीडा शिक्षक नेमावेत, विद्यार्थ्यांना पोष्टीक आहार मिळावा, शिक्षकांसाठी निवास व्यवस्था उभारावी आणि आश्रमशाळांचा दर्जा सुधारावा, तसेच आदिवासी विद्यार्थ्यांवर होणारा भेदभाव तात्काळ थांबवावा, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

आरोग्य सुविधांच्या बाबतीत मेळघाटातील ग्रामीण रुग्णालये व आरोग्य केंद्रांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता असून बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, हाडांचे डॉक्टर, रक्तपेढी, सीटी स्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी यांसारख्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. धारणी येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालय उभारावे, चुर्णी ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा दर्जा द्यावा, १०८ रुग्णवाहिकांची संख्या वाढवावी आणि दुर्गम भागासाठी एअर अँब्युलन्सची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

**■ पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये टँकर व्यवस्था व जलशुद्धीकरण यंत्रणा बसवाव्यात, जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामांची चौकशी करावी, नदी-नाल्यांवर बंधारे उभारावेत तसेच सिंचनासाठी डॅममधून लिफ्ट इरिगेशन योजना राबवावी, अशी मागणीही या पदयात्रेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. मेळघाटातील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट असल्याने रस्त्यांचे रुंदीकरण, दुर्गम गावांना नवीन रस्ते, सुरक्षित वाहतुकीसाठी लहान बसेस, ट्रॅव्हलर व जीप सेवा सुरू करावी, तसेच आपत्कालीन परिस्थितीत एअरलिफ्टची व्यवस्था असावी, असेही बच्चू कडू यांनी नमूद केले.**

**■ एकूणच ही पदयात्रा मेळघाटातील रोजगार, आरोग्य, शिक्षण, पाणी, वीज, रस्ते, वन्यप्राणी हल्ले आणि कर्जमाफी यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर सरकारला जागे करण्यासाठी काढण्यात येत असून, शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा बच्चू कडू यांनी व्यक्त केली आहे.**

## रिसोड पंचायत समितीत व्यसनमुक्तीचा एल्गार

### विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानचा 'थेट प्रहार'!

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी-**




पिढी बरबाद करणाऱ्या व्यसनांच्या विळख्यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी आता केवळ उपदेश करून चालणार नाही,तर त्यासाठी मैदानात उतरून प्रहार करावा लागेल,याच निर्धाराने आज विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने पंचायत समिती रिसोड येथे व्यसनमुक्ती जनजागृतीचा धडाका उडवून देण्यात आला.दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेला हा कार्यक्रम म्हणजे केवळ एक औपचारिकता नसून, व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणाईला सावरण्यासाठी फुंकलेले रणशिंग ठरले आहे. सध्याच्या काळात दारू,गुटखा आणि अंमली पदार्थांच्या विळख्यात ग्रामीण भागातील तरुण पिढी होरपळून निघत आहे.संसाराच्या राखेवर व्यसनाची घरे उभी राहत असताना प्रशासन आणि समाज गप्प बसू शकत नाही. याच जाणीवेतून विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानने आज रिसोड पंचायत समितीचा परिसर आपल्या घोषणांनी दणाणून सोडला."व्यसन सोडा, कुटुंब वाचवा" अशा स्पष्ट आणि परखड शब्दांत कार्यकर्त्यांनी उपस्थितांचे डोळे उघडले. या विशेष मोहिमेचे नेतृत्व संस्थेचे अध्यक्ष प्रदीप खंडारे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात व्यसनाधीनतेवर कडाडून टीका केली.खंडारे म्हणाले की, "व्यसन हे केवळ माणसाला मारत नाही,तर संपूर्ण पिढीला अपंग करते. विठाई प्रतिष्ठान आता गल्लीपासून दिल्लीपर्यंत हा लढा अधिक तीव्र करेल." यावेळी मंचावर आणि जनसमुदायात संस्थेचे सक्रिय सदस्य जियाउर खान,व समाजसेवक सैय्यद अकिल भाई,माजी पंचायत समिती सदस्य गजानन वाघ,सिताराम गिरे,प्रशांत मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या ; हमीभावाचा कायदा लागू करा.

### मूर्तिजापूरच्या शेतकऱ्यांचे पंतप्रधानांना साकडे.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**

सध्याचा शेतकरी हा प्रचंड आर्थिक विवंचनेत असून तणावपूर्ण जीवन जगत आहे. या बिकट परिस्थितीतून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी त्याला आर्थिक कवच असलेल्या 'हमीभावाचा कायदा' त्वरित लागू करणे आवश्यक आहे, अशी मागणी मूर्तिजापूर येथील जनमंच आणि प्रगती शेतकरी मंडळाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावे असलेले निवेदन उपविभागीय अधिकारी मा. संदीप अपार यांच्यामार्फत सादर करण्यात आले.

हमीभाव कायद्याची अंमलबजावणी: यावर्षी शेतमालाला हमीभावापेक्षा १५०० रुपयांपर्यंत कमी भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, हे रोखण्यासाठी कायद्याचे संरक्षण मिळावे.

सरसकट कर्जमाफी बाजारभावाअभावी शेतकऱ्यांची कर्ज परतफेड करण्याची क्षमता संपली आहे. त्यामुळे चालू व थकीत पीक कर्ज सरसकट माफ करून त्यांना नव्याने उभारी द्यावी.

वन्यप्राण्यांचा बंदोबस्त वन्यप्राण्यांकडून होणारे पिकांचे नुकसान ही 'राष्ट्रीय हानी' घोषित करावी. यासाठी नाबार्ड व रिझर्व्ह बँकेला निर्देश देऊन १५ वर्षांचे दीर्घ मुदतीचे शेत कुंपण धोरण राबवावे आणि त्यावर केंद्र व राज्य शासनाचे अनुदान मिळावे.

शेतकरीभिमुख पीक विमा: पीक विम्याच्या जाचक अटी कमी करून हे धोरण अधिक पारदर्शक आणि शेतकरी हिताचे करावे.

निवेदनावर स्वाक्षरी करणारे: या निवेदनावर राजूभाऊ वानखडे, प्रा. सुधाकर गौरखेडे, कैलास साबळे, मन्ना नाईकनवरे, नंदकिशोर बबानिया, पंकज कांबे, निखिल गावंडे, अनिल देवगिरकर, नंदकिशोर महल्ले, श्रीकृष्ण गुल्हाने, प्रफुल्ल मालधुरे, अरुण गावंडे, हरिभाऊ वानखडे, छोटूभाऊ बोंडे, प्रशांत गावंडे, जयेश टाले, पंजाबराव गावंडे, प्रकाश अंबुलकर, उमेश वरनकर, आणि अरुण बोंडे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रक्तदान शिबिर संपन्न



**▸विदर्भ केसरी। परतवाडा**

धामणगाव गढी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दिनांक 25 फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले असता धामणगाव गढी येथील युवकांनी चांगला प्रतिसाद देत रक्तदान शिबिर यशस्वी केले.

रक्तदान हेच श्रेष्ठदान आजच्या काळात तरुण युवकांमध्ये रक्तदानाविषयी अतिशय चांगल्या प्रमाणात जागरूकता निर्माण झाली आहे. त्याची प्रचिती देत या शिबिराला सुद्धा गावातील तरुणांनी चांगला प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिराला अमरावती जिल्हा रुग्णालय येथील रक्तपेढी कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी मदत केली.

गावातीलच संगम गिऱ्हे, राम मासुरकर, मदन गायन, अनिल गायन, कपिल नन्नावरे यांच्यासह अनेक युवकांनी रक्तदान केले.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र धामणगाव गढी येथील डॉ लेखिका गाडबैल, यांच्यासह आरोग्य केंद्र येथील कर्मचारी उपस्थित होते.

## नांदगाव खंडेश्वरमधील पाणीपुरवठा विस्कळीत

### नगरसेविका प्रांजली गुल्हाने यांची समितीच्या तातडीच्या बैठकीची मागणी

**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर ( तालुका प्रतिनिधी )**



नांदगाव खंडेश्वर स्थानिक नगर पंचायत क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना सध्या विविध तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणींच्या विळख्यात सापडली असून, शहरातील अनेक प्रभागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर, प्रभाग क्रमांक १४ च्या नगरसेविका सौ. प्रांजली राहुल गुल्हाने यांनी पाणी पुरवठा व जलनिस्तारण समितीच्या सभापतींना पत्र लिहून समितीची तातडीची विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात ठराविक प्रभागांमध्ये पाणी वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये मोठा रोष निर्माण झाला आहे. विशेषतः उन्हाळा तोंडावर असताना उद्भवलेली ही समस्या गंभीर स्वरूप धारण करू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. या समस्यांवर वेळीच उपाययोजना करण्यासाठी आणि पाणीपुरवठा योजनेला गती देण्यासाठी ही बैठक होणे आवश्यक असल्याचे गुल्हाने यांनी पत्रात नमूद केले आहे.

बैठकीत 'या' मुद्द्यांवर चर्चेचा आग्रह: नगरसेविका प्रांजली गुल्हाने यांनी पत्रात प्रामुख्याने चार विषयांवर चर्चा करण्याची मागणी केली आहे:

१. पाणीपुरवठा योजनेचा सद्यस्थितीतील प्रगती अहवाल सादर करणे.

२. पाणी विस्कळीत होण्याची नेमकी कारणे शोधून त्यावर ठोस उपाय करणे.

३. आगामी उन्हाळ्यासाठी पाणी टंचाईचे सूक्ष्म नियोजन करणे.

४. दुरुस्ती व देखभालीसाठी आवश्यक निधी आणि तांत्रिक कामांचा आढावा घेणे.

लोकहित लक्षात घेता तातडीने निर्णय घेण्याची विनंती:

नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत, पुढील २ ते ३ दिवसांत ही विशेष बैठक बोलवावी, अशी विनंती सौ. गुल्हाने यांनी सभापतींना केली आहे. तसेच, या संदर्भात प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची प्रत माहितीसाठी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे. आता नगर पंचायत प्रशासन आणि पाणीपुरवठा समिती यावर काय पावले उचलते, याकडे नांदगाव खंडेश्वरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## अभ्यासिकेच्या निर्माण कार्यासाठी ५१ हजार रूपयांची मदत

### *दानशुर व्यक्तींना मदतीचे आवाहन : लोकविकास संघटना व अ.भा, ग्रामीण पत्रकार संघाचा उपक्रम

**▸विदर्भ केसरी। चांदुर बाजार /**



- तालुक्यातील गोर गरीब विद्यार्थ्यांना अभ्यासिकेचे वाचनालय मिळावे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या काळात कुठे हि मागे राहु नये व त्याला अभ्यासासाठी वाचनालय असावे या करता लोकविकास संघटनेचे अध्यक्ष गोपाल भालेराव व अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रिय प्रसिध्दीप्रमुख सागर सवळे यांनी दानशुर व्यक्तींनी मदत करावी असे आवाहन केले होते. लोक विकास संघटनेने व अ.भा. ग्रामीण पत्रकार संघ यांनी आता पर्यंत विविध समाज उपयोगी कार्य केले आहे. गोरगरिब विधवा महिलांना दानशुरांच्या मदतीने चांदूर बाजार तालुक्यात घरे बांधून दिले. विविध आरोग्य शिबिर राबविले, वृक्ष लागवड केली, शेतकर्यांच्या समस्या सोडविण्याचे काम नियमीत सुरू, गोरगरिब गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला. विविध शासकीय योजनेचा नागरीकांना लाभमिळवून दिला. शासकीय योजना नागरिकांन पर्यंत पोहचविण्याचे काम सुरु आहे. विविध सामाजिक उपक्रम राबवित आहेत. आता लोकविकास संघटनेचे अध्यक्ष गोपाल भालेराव व अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रिय प्रसिध्दीप्रमुख सागर सवळे यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांचा अभ्यास करण्याकरिता उचित ठिकाण मिळत नाही म्हणूनच आपण ग्रामीण भागात मोठ्या अभ्यासिकेचे (इमारतीचे) निर्माण कार्य हाती घेतले आहे. जेणेकरून गाव खेड्यातील मुलांना त्या ठिकाणी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेचे पुस्तके व साहित्य उपलब्ध करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सहकार्य होईल. त्या कार्यासाठी आर्थिक मदत दानशुर व्यक्तींनी करण्याचे आवाहन लोकविकास संघटना व ग्रामीण पत्रकार संघाकडून करण्यात आले.त्या अभ्यासिकेच्या इमारतीचे बांधकामासाठी गो.सी. टोम्पे महाविद्यालय पब्लिक ट्रस्ट चांदुर बाजार चे अध्यक्ष भाष्करदादा टोम्पे यांनी अभ्यासिकेच्या बांधकामासाठी स्वर्गीय केशवदादा टोम्पे यांच्या स्मृतिपित्यार्थ ५१ हजार रूपयांची मदत केली.यावेळी संस्थेचे अध्यक्ष भाष्कर दादा टोम्पे, केंद्रिय प्रसिध्दी प्रमुख सागर सवळे ,प्राचार्य राजेंद्र रामटेके,प्राचार्य संजय शेजव ,प्राचार्य मनिष सावरकर,श्रीष हिंगे आदी प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,

Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

GOOD MORNING
कॉटनसिटी



!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## २ लाखांचे सोन्याचे दागिने गायब

**पोफाळी:पोलीस स्टेशन हद्दीत बसमधील प्रवाशाची सोन्याची पोत चोरीला गेली आहे. फिर्यादी सौ. सविता शालीकराम गडवे (वय ५०) या शेगाव ते उमरखेड बसने प्रवास करत असताना ही घटना घडली. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समध्ये ठेवलेली १५ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत चोरून नेली, ज्याची किंमत २,१०,००० रुपये आहे. याप्रकरणी पोफाळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून प्रवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.**

# प्रमुख जिल्हा मार्गाचे आठ वर्षात पांदाण?

## कोटी रुपयांचा खर्च व्यर्थ : आदिवासी बहुल हिवरा, इंगलवाडी, गोस्ता भागातील नागरिकांच्या आयुष्याशी खेळ

**▸विदर्भ केसरी। मानोरा :--**



तालुक्यातील आदिवासीबहुल हिवरा, ईंगलवाडी ते डोंगरी भागातील गोस्ता या गावांना जोडणाऱ्या रस्त्याची निर्मिती व दर्जोन्नती शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून अर्थसहाय्य घेऊन जिल्हा कार्यकारी अभियंता कार्यालय मुख्यमंत्री ग्राम सडक योजना यांच्या देखरेखी खाली तयार करण्यात आले आहे. ऊणे पुरे सात वर्ष आयुष्य या रस्त्याला लाभले असून हा रस्ता आता मरणपंथाला लागून याचा वापर करणाऱ्या वाहनधारकांनाही स्वर्ग काही बोटावर असल्याची अनुभूती दररोज येत असल्यामुळे उपरोक्त विभाग सर्वसामान्य नागरिकांच्या शारीरिक हानी अथवा मृत्यूनंतरच या रस्त्याकडे आपली कृपादृष्टी वळवेल काय असा संतप्त सवाल उपरोक्त गावातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कार्यकारी अभियंता महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था वाशिम यांच्या देखरेखीखाली आठ कोटी नऊ लक्ष पंचेचाळीस हजार रुपये खर्च करून उपरोक्त १८ किमी रस्त्याचे बांधकाम व दर्जेन्नती सन २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. पुसद येथील श्री गजानन कन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदाराकडून उपरोक्त रस्त्याचे बांधकाम व दर्जोन्नती करण्यात आली असून केवळ आठ वर्षात या रस्त्याची पूर्ण वासलात लागल्यामुळे अशा कंत्राटदार कंपन्यांना कुठल्या निकषाखाली कोट्यावधी रुपयाच्या बांधकामाची कामे संबंधित विभागातील प्रशासकीय यंत्रणा देते असा सवाल या रस्त्याने येजा केल्यावर आल्याशिवाय राहत नाही. शतकांपूर्वी ब्रिटिशांनी बांधलेले रस्ते व पूल आजही त्यांच्या मजबुतीची साक्ष देत असताना स्वदेशी कंत्राटदार कंपन्यांनी केवळ बोटावर मोजण्या एवढ्या वर्षांपूर्वी निर्माण केलेली बांधकामे का टिकत नाहीत असा सवाल सुद्धा यानिमित्ताने आ वासून उभा आहे. निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीवर व ज्यांच्या देखरेखित हा रस्ता बांधकाम व दर्जोन्नती झाली त्या विभागातील कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई होण्याची मागणी उपरोक्त गावातील नागरिकांमध्ये आता जोर धरत आहे.

**सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जि. प. अंतर्गत असलेल्या बांधकाम विभागाकडे ऊपरोक्त रस्ता गतवर्षी हस्तांतरित करण्यात आल्याची माहिती पुढे येत असून या रस्त्याचा मायबाप कोणी आहे की नाही असे सुद्धा लयास गेलेल्या रस्त्यामुळे बोलले जात आहे.**

## महत्त्वाचे



### बाभुळगाव बसस्थानकावर रास्ता रोको दरम्यान रुग्णवाहिका अडकली !

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर बाळापुर**

केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे पदाधिकारी यांनी २६ फेब्रुवारी गुरुवार रोजी पातूर तालुक्यातील बाभुळगाव बस स्थानक परिसरात सकाळी ११ वाजताच्या सुमारास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तर रास्ता रोको आंदोलन दरम्यान चक्क १५ मिनिट रुग्णवाहिका अडकली असल्याचे चित्र निर्माण झाले होते. रुग्णवाहिकेचे चालक सुधाकर धाडसे यांनी माईक वरून रुग्ण असल्याचे सागून रस्ता मोकळा करून देण्यात यावा अशी विनंती करीत होते त्यानंतर पोलिसांनी उपस्थित यांनी रस्ता मोकळा करण्यात आला.रस्ता रोको दरम्यान मोठ्या प्रमाणात वाहनाचा रांगा लागल्या असून रुग्णवाहिकेचा वारंवार हॉर्न वाजून सुद्धा त्या रुग्णवाहिकेला लवकर बाहेर निघता आले नसल्याने चर्चेचा विषय ठरला होता.या रुग्णवाहिकेमध्ये २२ वर्षीय भंडारज येथील गरोदर माता असल्याचे चालक यांनी सांगितले . स्थानिक बाभूळगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून त्या गरोदर महिलेला अकोला येथे उपचारासाठी हलविण्यात आले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

### रमजानचा एक दिवसीय अरहानचा उपवास उत्सव साजरा

**▸विदर्भ केसरी। शेलुबाजार वार्ता**

मुस्लिम बांधवांचा महत्त्वाचा उत्सव म्हणजे रमजानचा महिना समजला जातो या उत्सवामध्ये परिवारातले सर्वच सदस्य सर्व परिवार उत्सवामध्ये सहभागी होऊन रमजानचा महिना येण्यापूर्वीच सर्व तयारी करत असतात तसेच एक दिवसीय उपवास या चिमुकल्याने सहभागी होऊन काटेकोरपणाने शहरी सकाळ सूर्योदयापूर्वीच पहाटे नमाज पठण करण्यात सुरुवात होते नंतर दिवसभर पहाटे ते सूर्यापर्यंत पाणी न पिता व काही न खाता उपास पाळणे हा महत्त्वाचा भाग आहे तसेच सूर्योदयापूर्वीच्या सेहरी जेवणाने सुरू होऊन सूर्यास्तानंतरच्या इफ्तारणे संपतो या काळात अन्न पाणी आणि धूम्रपान पासून परिवारातले बांधव दूर राहून स्वयं पाडला जातो ही केवळ उपाशी राहणे नसून अल्लाहाची इबादत आत्मशुद्धी आणि शिस्तीचा एक पवित्र भाग आहे त्यानंतर एक दिवसीय चिमुकल्या अरहान खान अयाज खान या मुलाने उपवास मध्ये सहभाग होऊन दुसऱ्या दिवशी सर्व परिसरातील बांधवांना चिमुकल्यांना जेवणाचा स्वाद म्हणून सर्वांना पोटभर प्रसाद वितरण करण्यात येतो व उपवास उत्सव साजरा करतात या चिमुकल्याबद्दल सर्वांनी परिसरात आनंद व्यक्त केला...!



### शिक्षणाधिकारी यांनी पोदार इंटरनॅशनल स्कूलला अल्पसंख्यांक दर्जा बाबत मागितला खुलासा

**▸विदर्भ केसरी। अकोला दि. २५**

वंचित बहुजन युवा आघाडी ने २०-२-२०२५ ला शैक्षणीक वर्ष २०२५-२६ च्या २५% आर. टी. ई. ऑन लाईन शाळा नोंदणी मध्ये पोदार स्कुल सहीत इतर शाळांनी नोंदणी केली नाही यांची तपासणी व्हावी व कारवाई साठी निवेदन देण्यात आले होते. आणि आंदोलनाचा इशाराही दिला होता. याची दखल घेत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पोदार स्कुल ला आपण अल्पसंख्याक संस्था असल्या बाबत आपल्या स्कुल मध्ये ५१% विदयार्थी हे भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्यांक कसे आहेत तसेच संस्थाचे पदाधिकारी ५१% अल्पसंख्यांक आहे काय? या बाबत खुलासा मागितला आहे. हा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००९ ला न जुमानणाऱ्या पोदार स्कुल प्रशासनाला मोठी चपराक आहे. वंचित घटकातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनिय २००९ अंतर्गत २५% मोफत प्रवेश मिळण्यासाठी इतर शाळाची देखील चौकशी गरजेची असून आधी आर टी ई मध्ये असलेल्या आणि आता अल्पसंख्य दर्जा मिळविलेल्या सर्व माहिती मागवून कार्यवाही करण्याची मागणी वंचित बहुजन युवा आघाडी महाराष्ट्र प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी केली आहे....!

# वणीत 'अपर जिल्हाधिकारी' तर शिरपूरला 'अपर तहसील' कार्यालय देण्याची जोरदार मागणी

### (मनसे नेते राजू उंबरकर यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र)

**▸विदर्भ केसरी। वणी/ प्रतिनिधी**



प्रशासकीय सुलभता आणि विकेंद्रीकरणाच्या नावाखाली राज्य सरकारने पुसद येथे 'अपर जिल्हाधिकारी कार्यालय' मंजूर करण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला असला, तरी या प्रक्रियेत राज्याला सर्वाधिक महसूल मिळवून देणाऱ्या वणी उपविभागावर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राजू उंबरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना थेट पत्र पाठवून वणी येथे 'अपर जिल्हाधिकारी कार्यालय' आणि शिरपूर येथे 'अपर तहसील कार्यालय' तातडीने मंजूर करण्याची आग्रही मागणी केली आहे.

उंबरकर यांनी आपल्या पत्रात वणी उपविभागाच्या भौगोलिक परिस्थितीचा अत्यंत परखडपणे ऊहापोह केला आहे. वणी हा विभाग भौगोलिकदृष्ट्या प्रचंड विस्तारलेला असून, झरी-जामणी आणि मारेगाव सारख्या दुर्गम व आदिवासीबहुल तालुक्यातील शेवटच्या टोकावरील गावांपासून जिल्हा मुख्यालय यवतमाळ हे सुमारे १५० ते २०० किलोमीटर अंतरावर आहे. साध्या शासकीय कामांसाठी, दाखल्यांसाठी किंवा आपल्या न्याय्य हक्कांसाठी सामान्य नागरिक, शेतकरी आणि कष्टकऱ्यांना आपला पूर्ण दिवस आणि कष्टाची मोठी पुंजी खर्च करून जिल्हा मुख्यालयाची पायपीट करावी लागते. वणी हा विभाग केवळ भौगोलिकदृष्ट्याच मोठा नाही, तर येथील कोळसा खाणी आणि औद्योगिक क्षेत्रामुळे हा भाग राज्याच्या तिजोरीत सर्वाधिक महसूल जमा करणाऱ्यांपैकी एक आहे. वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार पाहता, प्रशासकीय कामाचा ताण कमी करण्यासाठी आणि जनतेला घरबसल्या सुविधा मिळवून देण्यासाठी येथे स्वतंत्र 'अपर जिल्हाधिकारी कार्यालयाची' नितांत गरज असल्याचे उंबरकर यांनी म्हटले आहे. यासोबतच, वणी तालुक्यातील ढाकोरी आणि बोरी सारख्या गावांतील नागरिकांना किरकोळ शासकीय कामासाठी वणी तहसीलमध्ये यावे लागते, तर त्यांचे इतर व्यवहार लगतच्या जिल्ह्यांमध्ये चालतात. ही गैरसोय दूर करण्यासाठी शिरपूर येथील लोकसंख्येचा आणि अंतराचा विचार करून तिथे 'अपर तहसील कार्यालय' निर्माण करणे काळाची गरज बनली आहे. पुसदला न्याय मिळू शकतो तर मग वणीच्या जनतेला या मूलभूत प्रशासकीय सुविधेपासून वंचित का ठेवले जात आहे? असा सवाल आता या निमित्ताने उपस्थित होत आहे. वणी, मारेगाव आणि झरी-जामणी या तिन्ही तालुक्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी शासनाने यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन शासन निर्णय (GR) निर्गमित करावा, अशी आक्रमक मागणी राजू उंबरकर यांनी केली असून, आता सरकार या जनहिताच्या मागणीवर काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# सुरक्षेची ऐशीतैशी

**▸विदर्भ केसरी।**

मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटाला निसर्गाचे वरदान लाभलंय खर,पण त्याचबरोबरच विविध गुन्ह्यांमुळे या घाटाची नाहक बदनामी होताना दिसत आहे.यामुळे घाटाच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.खून करुन त्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी कशेडीघाटाचा सर्रासपणे वापर केला जात आहे.या घटनांचा शोध घेताना पोलिसांचीही दमछाक होते.यासाठी या घाटावर नजर ठेवण्यासाठी आता तिसऱ्या डोळ्याची अर्थात सीसीटीव्ही गरज भासू लागली आहे.शिवाय दोन्ही बाजूकडून रात्रीची गस्त वाढविणे गरजेचे बनले आहे.

गेल्या वर्षी एप्रिल 2025 मध्ये पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेने तिच्या साथीदारासह चालत्या कारमधून एका व्यक्तीचा ओढणीने गळा आवळून ठार मारून त्याचे प्रेत कशेडी घाटातील जुन्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगतच्या सिमेंट काँक्रीटच्या भिंतीलगत फेकून पलायन केले होते.त्या नंतर नुकतीच आंबेनळी घाटात जळलेल्या अवस्थेत महिलेचा मुतदेह सापडल्याने दोन्ही घाट माथ्यावर तिसऱ्या डोळ्यांची आवश्यकता व रात्रीची ग्रस्त वाढविणे गरजेचे बनले आहे. गेल्या वर्षी एप्रिल 25 मध्ये कशेडी घाट परिसरातील एका काँक्रीटच्या भिंतीलगत एका पुरूषाचे प्रेत सापडल्यानंतर त्याच्या मारेकरी प्रेयसी आणि तिच्या साथीदाराचा यशस्वीरित्या शोध पोलादपूर पोलिसांनी घेतला होता. त्यानंतर पुन्हा अशाच एका काँक्रीटच्या भिंतीच्या मोरीच्या पाईपामध्ये महिलेचे जळलेले प्रेत आढळल्याने आव्हान उभे ठाकले आहे. महिलेच्या खुनानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी जाळले असण्याची शक्यता पोलीसांकडून वर्तविण्यात आली असून आंबेनळी घाटात 'घडलेल्या घटने नंतर पोलादपूरकर हादरल्याचे दिसून आले. मृत महिलेल्या जळलेल्या अवस्थेतील प्रेताच्या दोन्ही पायामध्ये चांदीची जोडवी असून हाताच्या बोटामध्ये सोन्याची अंगठी व लाल खडा असल्याचे दिसून आले. मृतदेह ताठरता आलेल्या अवस्थेत असल्याने जाळण्यापूर्वीच महिलेचा खुन झाल्याची प्राथमिक शक्यता दिसून आली.

# होळीसाठी वृक्षतोड केल्यास एक लाखांचा दंड

**▸विदर्भ केसरी। पुणे :**

शहरात होळीसाठी झाडांच्या फांद्या तोडण्याचे प्रकार होऊ नयेत, यासाठी पुणे महापालिका प्रशासन सतर्क झाले आहे. विनापरवाना झाडे तोडणे, जाळणे किंवा झाडांना कोणत्याही प्रकारे इजा करणे हा कायद्याने गुन्हा असून, अशा प्रकारांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 2021 नुसार परवानगीशिवाय वृक्षतोड केल्यास संबंधित झाडाच्या मूल्याइतका दंड आकारला जाऊ शकतो. हा दंड एक लाख रुपयांपर्यंत असू शकतो. त्यामुळे होळीच्या निमित्ताने वृक्षतोड करू नये, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. शहरात काही ठिकाणी होळीसाठी झाडांच्या फांद्या कापणे किंवा झाडांची छाटणी करण्याचे प्रकार घडतात. मात्र, अशा कृतींमुळे पर्यावरणाची हानी होत असून, संबंधितांवर गुन्हा दाखल होऊ शकतो, असे महापालिकेने नमूद केले आहे. वृक्ष प्राधिकरणाकडून यासंदर्भात लक्ष ठेवले जाणार असून, तक्रार आल्यास तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

**विनापरवाना वृक्षतोड किंवा झाडांना हानी होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारींसाठी 18001030222 हा टोल-फ्री क्रमांक, 9689900002 हा व्हॉट्सअॅप क्रमांक तसेचु. लोश्रिरपळीं. रीपिशलेौीरिेंळेपें.ीस या संकेतस्थळाचा उपयोग करता येणार आहे.**

# नारायणा ई-टेक्नो स्कूलमध्ये भव्य क्लब क्लब कल्मिनेशन कार्यक्रम आयोजित.

## ई-टेक्नो च्या ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ:**





विद्यार्थ्यांची शैक्षणिक उत्कृष्टता वाढविण्यासाठी आणि पालकांना त्यांच्या मुलांची प्रगती पाहण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी नारायणा ई-टेक्नो स्कूलने त्यांचा बहुप्रतिक्षित क्लब समारोप कार्यक्रम शनिवार दि. 21.02.26 यशस्वीरित्या आयोजित केला.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार विजेते डॉ. संजय संभाजवार आणि प्रसिद्ध कलाकार रणजित वनकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्राचार्या श्रीमती अश्विनी थानवी, ई- चॅम्प्स समन्वयक नेहा गुप्ता, ई-किड्सच्या उपप्राचार्य स्नेहा झरे आणि शैक्षणिक डीन श्री. नागमल्लेश्वर यांच्या सन्माननीय उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यांच्या प्रोत्साहनाने या कार्यक्रमाला मोठे महत्त्व प्राप्त झाले.

रॉयल माइंड्स, क्राफ्ट क्रॉनिकल्स, व्हॉइस क्राफ्ट आणि स्क्रिप्ट अँड स्क्रोल या चार उत्साही क्लबने विद्यार्थ्यांच्या अपवादात्मक प्रतिभा आणि वर्षभराच्या शिक्षणाचे प्रदर्शन केले. बौद्धिक प्रतिभा आणि कलात्मक सर्जनशीलतेपासून ते आत्मविश्वासपूर्ण संवाद कौशल्यांपर्यंत, विद्यार्थ्यांनी त्यांचे सर्वोत्तम प्रदर्शन केले आणि पालक आणि पाहुण्यांकडून प्रचंड कौतुक मिळवले.

क्लब कल्मिनेशन कोऑर्डिनेटर श्री. अंकुर कैपलयावार यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री. आशिष फाले, श्री. राजेश भानोथ, श्री. देवांशू डावरे आणि संपूर्ण शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे या कार्यक्रमाचे भव्य यश शक्य झाले. समग्र शिक्षण आणि विद्यार्थी विकासासाठी शाळेच्या वचनबद्धतेमध्ये आणखी एक मैलाचा दगड ठरत हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# बाबासाहेब नाईक अभियांत्रिकीत गेटी उत्साहात

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**




स्थानिक बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयात दि.२० फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान सांस्कृतिक मेळावा गेटी -२६ उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य डॉ. अविनाश वानखडे तर प्रा. प्रदीप दुधाट, प्रभारी,स्टुडंट्स अफेअर व प्रा. के एम पुनवटकर ,प्रभारी, विद्यार्थी मंडळ मंचावर उपस्थित होते.

उत्कृष्ट अभियंता होताना भविष्यातील करिअरसाठी व नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी अशा संस्कारक्षम सांस्कृतिक व्यासपीठाचा वापर स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत डॉ. अविनाश वानखडे यांनी यावेळी व्यक्त केले. महाविद्यालयातील सोनेरी दिवस परत येत नसतात आणि म्हणूनच या संधीचा फायदा घेऊन सर्वांनी या व्यासपीठाचा वापर जीवनातील आठवणीच्या क्षणासाठी करावा आणि भावनिक अभिव्यक्तीसह आत्मविश्वास वाढवावा, असे ते पुढे म्हणाले. संस्कृतिक मेळाव्यात नृत्य स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, संगीत नाटिका, ट्रॅडिशनल डे, ग्रुप डे , फन फेअर, तांत्रिक व कला प्रदर्शनी, रांगोळी व पोस्टर मेकिंग, कुकिंग विदाऊट फायर व न्युज पेपर ड्रेस मेकिंग अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उस्फूर्त व उदंड प्रतिसाद लाभला. या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा हा संगीतमय जीवनपट सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला यातील सर्वांचा अभिनय व नृत्य यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले याप्रसंगी साईनाथ शेवाळे ,विद्यापीठ मेरिट, ओंकार पवार, विद्यापीठ कलर कोट व राजेश्वरी गुजारे उत्कृष्ट स्वयंसेविका यांचा शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी समृद्धी जोशी, रेणू मुक्कावार ,श्रावणी समर्थ, निशांत चौधरी,शाहेबाज शेख, प्रवीण देवकर ,सलोनी अवस्थी आशा शिंदे, सुजाता चव्हाण, गोपाल काळे व शीतल चव्हाण या विद्यार्थी मंडळातील पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन योगेश्वरी नेमायेते ,अंतरा डहाळे ,अपूर्वा नागरे ,कृष्णा अनंतवार, लीना राठोड व कार्तिक पवार यांनी केले .याप्रसंगी संस्थेतील सर्व विभाग प्रमुख ,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जय नाईक यांनी सर्वांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# १३ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत यशस्वी

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर -**



शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक सत्र २०२५–२६ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत पातुर्डा येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील १३ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत घवघवीत कामगिरी केली.

एनएमएमएस योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना दरवर्षी १२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती ८वी ते १२वीपर्यंत मिळणार असून एकूण ४८ हजार रुपयांचा लाभ होणार आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकवर्गात आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये महावीर देशमुख, मानव इंगळे, गणेश निमकर्डे, शिवम शिरोडकर, अंकुश वानखडे, ओम ढोकणे, कुंदन खंडेराव, विराज दांडगे, नयना धर्माळ, प्रतीक्षा दाभाडे, पायल दाभाडे, खुशी दाभाडे आणि अंकिता भोजने यांचा समावेश आहे. या यशामागे मार्गदर्शन वर्गशिक्षक एम.एस.जुमडे व एस.एस.कराड यांचे विशेष परिश्रम लाभले. प्राचार्य आर.एस.मावसकर यांच्या हस्ते तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू पाटील भोंगळ यांच्या उपस्थितीत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गुलपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दसोरे सर, हरिहर मानकर, उभे सर, लिपिक बोरसे, श्लोक राऊत, मानकर मॅडम, पाठक मॅडम, सोनाग्रे मॅडम, गुरव मॅडम, डायलकर मॅडम, येंबडवार मॅडम यांसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या या यशामुळे पातुर्डा परिसरात शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू





### 27 फेब्रुवारीपासून नवीन मोटार सायकलची सिरीज

**■ यवतमाळ : परिवहनेत्तर विभागातील नवीन मोटार सायकलची सध्याची एमएच 29 सीएन सिरीज संपुष्टात येत असल्यामुळे एमएच 29 सीक्यु ही नवीन सिरीज 27 फेब्रुवारीपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांनी दिली आहे. ज्या ग्राहकांना नवीन आकर्षक नंबर घ्यायचा असेल त्यांनी कार्यालयात येऊन अर्ज सादर करावे. ही मुभा फक्त एका दिवसासाठी उपलब्ध राहील, त्यानंतर ऑनलाईन सुविधेचा उपयोग करता येईल, यांची ग्राहकांनी नोंद घ्यावी, असे अवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांनी केले आहे**

## महत्त्वाचे



**आज राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्यनेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत यवतमाळ व वणी येथील विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी पक्षात नव्याने प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.**

### अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाची संधी !

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबविण्यात येत आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमाती ४० विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क आणि आरोग्य विमा अशी सर्वसमावेशक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. शैक्षणिक आकस्मिक खर्चासाठी युएएस व इतर देशांसाठी (यूके वगळून) दरवर्षी १ हजार ५०० यूएस डॉलर, तर यूकेसाठी १ हजार १०० जीबीपी इतकी रक्कम दरवर्षी देण्यात येईल.

**■ योजनेसाठी पात्रता**

या योजनेसाठी विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील व महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे, तर पीएचडीसाठी ४० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असावे. विद्यापीठाची क्युएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक असून पात्र विद्यार्थी उपलब्ध नसल्यास उत्पन्न मर्यादा १० लाखांपर्यंत शिथिल केली जाईल. क्युएस वर्ल्ड रँकिंग ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. तसेच TOEFL, IELTS किंवा समकक्ष प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य राहील.

**■ अर्ज कसा करायचा**

'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती'योजनेसाठी इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी https://fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर विहित नमुन्यात ऑनलाइन अर्ज सादर करणे बंधनकारक असून अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जातील. निवड समितीमार्फत निकष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली जाईल. या शिष्यवृत्तीमुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशात उच्च शिक्षण घेण्याच्या स्वप्नांना बळ मिळणार असून सन २०२६-२७ शैक्षणिक वर्षात ४० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. इच्छुक व

# शेतकरी प्रश्नांवर शिवसेना (उबाठा) आक्रमक

## मूर्तिजापूर अकोला-अमरावती मार्गावर 'रास्ता रोको', वाहनांच्या लांबच लांब रांगा

**▸विदर्भ केसरी।मूर्तिजापूर**



शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आज मूर्तिजापूर अमरावती-अकोला मार्गावरील तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. आमदार नितीन देशमुख, जिल्हा प्रमुख गोपाल दात कर, जिल्हा प्रमुख मंगेश काळे यांच्या आवाहनानुसार जिल्ह्यात ५३ ठिकाणी करण्यात आलेल्या आंदोलनाचाच हा एक भाग होता

या आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ट्रॅक्टर, डंपर आणि इतर मालवाहू वाहनांच्या कित्येक किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलकांनी रस्त्यावर ठाण मांडल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती आंदोलनादरम्यान पदाधिकाऱ्यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध केला. प्रामुख्याने खालील मागण्या मांडण्यात आल्या: भारत सरकारने अमेरिकेसोबत केलेले शेतकरी विरोधी करार तातडीने रद्द करावेत. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली पीक विम्याची हेक्टरी १७,००० रुपये रक्कम शेतकऱ्यांना त्वरित अदा करावी. शेतकरी हिताचे निर्णय घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या सरकारचा निषेध.

आंदोलनात मूर्तीजापूर बायपास सह शेलू बाजार, धोत्रा फाटा लाखपुरी फाटा, सिरसो फाटा, परिसरातील शिवसेना पदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने: तालुका नेतृत्व प्रमुख गजानन चौधरी, प्रमुख उपस्थिती चंद्रकांत तिवारी, अरविंद तायडे, अमोल तांबडे, छबीले पाटील,बंडू पाटील लांडे,विकास लकडे,उदय शिंदे, विजय साबळे,विलास देशमुख, रेखाताई कराड, ज्योती ताई लोखंडे, रेश्मा ताई चव्हाण, सचिन तांबडे, अमर ठाकरे, मनोज गायकवाड, अरुण पाटील, बाळासाहेब खांडेकर, उमेश इंगळे, बच्चू भाऊ देशमुख, मयूर साबळे, निखिल गाडवे, सचिन साबळे, मुकेश साबळे संजय शेजव, संजय साबळे,बालू राऊत, बंडूभाऊ वैराळे,विनायकभाऊ खंदारे,

सागरभाऊ धोटे, सतीशभाऊ आळे, प्रज्वल गावंडे,रवींद्र इंगळे, किशोर निकाडे, कौस्तुभ मुगल, विलास वरघाट, अभिजीत गावंडे, बाळूभाऊ राणे, उमेश कोरडे, नंदूभाऊ वाकोडे, कृष्णकांत लकडे, सागर तांबडे व तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते. जोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत हा लढा अधिक तीव्र केला जाईल, असा इशारा यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिला.आंदोलकांनी रस्त्यावर ठाण मांडल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. प्रमुख मागण्या आंदोलनादरम्यान पदाधिकाऱ्यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध केला. प्रामुख्याने खालील मागण्या मांडण्यात आल्या: भारत सरकारने अमेरिकेसोबत केलेले शेतकरी विरोधी करार तातडीने रद्द करावेत. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली पीक विम्याची हेक्टरी १७,००० रुपये रक्कम शेतकऱ्यांना त्वरित अदा करावी. शेतकरी हिताचे निर्णय घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या सरकारचा निषेध.

प्रमुख उपस्थिती या आंदोलनात मूर्तीजापूर आणि परिसरातील शिवसेना पदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. यामध्ये शेकडो शेतकरी उपस्थित होते. जोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत हा लढा अधिक तीव्र केला जाईल, असा इशारा यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिला.

# 'श्रमसंस्कारातूनच घडते आदर्श पिढी.

## हिरपूर येथे रासेयो शिबिराचे उत्साहात उदघाटन.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**



स्थानिक मधुकरराव पवार कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम हिरपूर येथे मोठ्या थाटात सुरू झाले आहे. २२ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या शिबिराचे अधिकृत उद्घाटन २४ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. प्राचार्यांच्या हस्ते शिबिराचे दीपप्रज्वलन कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन बंडगर यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बंडगर यांनी रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवनात होणाऱ्या सकारात्मक बदलांवर प्रकाश टाकला. त्यांनी स्वतःचे अनुभव कथन करत विद्यार्थ्यांना श्रमदानासाठी प्रेरित केले व आगामी सात दिवसांत राबवल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांचा आढावा घेतला. श्रमसंस्काराचे महत्त्व अधोरेखित कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. इंद्रसिंग पवार उपस्थित होते. त्यांनी युवकांना संबोधित करताना सांगितले की, "श्रम हीच खरी पूजा आहे. शिबिरातील सात दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्याला शिस्त आणि सेवाभावाची नवी दिशा देणारे ठरतील." विविध उपक्रमांचे नियोजन कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. माधुरी पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी या सात दिवसांच्या कालावधीत गावात राबवल्या जाणाऱ्या स्वच्छता अभियान, आरोग्य जनजागृती आणि इतर सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याचे नेटके सूत्रसंचालन दिपाली प्रभे या विद्यार्थिनीने केले, तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रुपेश वानखडे यांनी मानले. याप्रसंगी हिरपूर शाळेच्या मुख्याध्यापिका, गावातील प्रतिष्ठित नागरिक, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे स्वागत करत स्वयंसेवकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# कृषी पुरस्कारांसाठी आता ऑनलाईन संगणक प्रणाली

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

: कृषी विभागामार्फत दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांना विविध पुरस्कार दिले जातात. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी कृषी विभागामार्फत स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.

## भाजप सरकार विरोधात घोषणाबाजी करत ठाकरे गटाचा रास्ता रोको !

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**



बाळापूर

केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजताच्या सुमारास तालुक्यातील विविध ठिकाणी तसेच वाडेगाव येथे रास्ता रोको आंदोलन केले. वाडेगाव बस स्थानक परिसरात झालेल्या रास्ता रोको आंदोलन दरम्यान रोडच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या जवळपास अर्धा तास लांबच लांब रांगा लागल्या होत्या .अमेरिकेसोबत शेतकरी विरोधी केलेला करार रद्द करण्याबाबत तसेच राज्य सरकारने जाहीर केलेल्या पीक विम्याचे हेक्टरी 17000 शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले त्यावेळी आमदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अरुण भाऊ पळसकर .दीपक शेठ मसने.अनंता काळे .रंजीत अहिर. अय्याज साहिल.चेतन कारंझकर . निवृत्ती मैसने. प्रेम तायडे. दत्ता मानकर. अमोल बावणे .संदीप घाटोळ. तसेच महिला आघाडीच्या कल्पना राहटे. यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते रास्ता रोको आंदोलनांमध्ये सहभागी झाले होते. दरम्यान बाळापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रकाश झोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वाडेगाव पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक संभाजी हिवाळे तसेच पारस पोलीस चौकीच्या प्रभारी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक पाटील मॅडम यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.अखेरीस आंदोलन कर्ते यांना पोलीस चौकीमध्ये नेऊन सोडून देण्यात आले.

## शासकीय वसतिगृहातील प्रवेश अर्जासाठी 10 मार्चपर्यंत मुदतवाढ

यवतमाळ : जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या शासकीय वसतीगृहासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून ऑनलाईन प्रवेश अर्जासाठी 10 मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह, आधार व स्वयंम या योजना १२ च्या नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येतात. या योजनेची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राबविण्यासाठी वसतीगृह प्रवेश प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली होती. राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाळ योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकातील बदलाबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

# एनसीसी कॅडेट प्रवीण काळे यांचा भव्य सत्कार

## गावासाठी ऐतिहासिक क्षण

**▸विदर्भ केसरी। दारव्हा प्रतिनिधी**



लोही (बाजार) नवी दिल्ली येथे पार पडलेल्या प्रजासत्ताक दिन परेड २०२६ (आरडीसी-२०२६) साठी लोही (बाजार) येथील सुपुत्र व एनसीसी ६२ महाराष्ट्र बटालियनचे वरिष्ठ अंडर ऑफिसर प्रवीण राजू काळे यांची निवड झाल्याने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या ऐतिहासिक यशाच्या पार्श्वभूमीवर लोही ग्रामपंचायत व लोही रामनगर येथील ग्रामस्थांच्या वतीने प्रवीण काळे यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रवीण काळे यांचे वडील राजू काळे व आई वंदना काळे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. या सत्कार सोहळ्यामुळे संपूर्ण गावात देशभक्तीचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा हा क्षण असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सत्कार सोहळ्याला ग्रामपंचायतचे सरपंच संजय रामभाऊ शिंदे, उपसरपंच राजू देवराव हळदे, ग्रामविकास अधिकारी विद्याधर चौधरी, विजय मलमकार, अंबादास इंगोले, विठ्ठल इंगोले, पुंडलिक वानखडे, रवी काळे, प्रवीण शिरसाट, डॉ. गजानन चव्हाण, प्रमिला काळे, कंटाळे काकू तसेच ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोही ग्रामपंचायत सध्या मुख्यमंत्री ग्रामसमृद्ध विशेष अभियानात सक्रिय सहभाग घेत असून विविध विकासकामे व उपक्रम राबवत आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ग्रामपंचायतीने पूर्वी पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वितरण केले होते. त्याच उपक्रमाचा भाग म्हणून प्रवीण काळे व त्यांच्या कुटुंबीयांना पर्यावरणपूरक पिशवी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना राजू काळे म्हणाले की, "मी नेहमीच गावाच्या विकासासाठी प्रयत्नशील असतो. गावातील तरुणांनी मोठे यश संपादन करावे, विविध क्षेत्रात प्रगती करावी, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत राहू. माझ्या मुलाचा झालेला हा सत्कार अभिमानास्पद असून भविष्यात गावातील अनेक मुलांना अशी संधी मिळावी, हीच अपेक्षा आहे."ग्रामपंचायत सातत्याने विविध विकासकामे, पर्यावरणपूरक उपक्रम व जनजागृती कार्यक्रम राबवत असून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे.

# सत्ताधारी भाजपाची असहिष्णुता चिंतेचा विषय

## माजी मंत्री प्रा. वसंतराव पुरके यांची खंत

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



जगातील सर्वोत्कृष्ट लोकशाही भारतात असून लोकशाही मुल्यांचा आम्ही स्विकार केला आहे. अशा परिस्थितीत न्याय निती आणि नैतिकतेचा गवगवा करणा-या भाजपा तसेच राज्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली असहिष्णुता चिंतेचा विषय बनली आहे, अशी खंत माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके यांनी व्यक्त केली. ते यवतमाळ येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

राज्यात खून, मारामारी, कमी लेखने, धर्मांधता, जातीयवाद प्रचंड वाढला आहे. संतांना सुध्दा अपेक्षित नसलेल्या गोष्टींचा आधार राज्यकर्ते घेत असल्याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली. समाजविरोधी घटनांच्या विरोधात कुणी आवाज उचलला तर त्यांना संपविण्याचा प्रयत्न केला जातो. असिम सरोदे, विश्वंभर चौधरी, निखील वागळे यांच्यासह अनेकांवर राज्यात हल्ले करण्यात आले. नरेन्द्र दाभोळकर, कलगिरी, पानसरे यांचे मारेकरी सुध्दा सापडले नाही हा गंभीर विषय आहे. त्यामुळेच आज आपल्या घरातील कर्ता पुरुष मारल्या गेल्यास त्यावर प्रतिक्रिया देण्यापेक्षा आपल्या घरातील बाकी जगले पाहिजे अशी मानसिकता आणि दहशत वाढत आहे. जो या विषयावर आवाज उचलेल त्याला तुरुंगात डांबले जात आहे. त्यामुळे सत्ताधा-यांमध्ये बंधुभाव आणि आपुलकिची भावना कधी निर्माण होईल असा प्रश्न सुध्दा वसंतराव पुरके यांनी उपस्थित केला. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी विरोधी पक्ष सुध्दा जिवंत राहीला पाहिजे. आज विरोधी पक्षातील नेत्यांना सभागृहात बोलूच दिले जात नाही. त्यांना राष्ट्रद्रोही ठरविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

बलात्कारी, चोरांचे सत्कार केले जात आहे. राज्याचे प्रमुख मारामारीची भाषा करतात. बेकायदेशीर कृत्य करणा-यांना पदमविभूषण पुरस्कार दिले जात आहे. ही सर्व अराजकता लोकशाही करिता घातक आहे. देश घडविण्यात ज्यांचे योगदान आहे अशांना सुध्दा न्याय नाकारल्या जात आहे, निदान न्यायव्यवस्था तरी सुरक्षित राहीली पाहीजे अशी अपेक्षा वसंतराव पुरके यांनी व्यक्त केली. पत्रकार परिषदेला काँग्रेसचे पदाधिकारी अरविंद वाढोणकर, सीमा तेलंगे उपस्थित होते.

### एफस्टीन प्रकरणात कारवाई करा

**■ जेफ्री एफस्टीन प्रकरणात भारतातील काही नेत्यांची नावे समोर आली आहे. हे प्रकरण माणुसकीला काळीमा फासणारे असून पंतप्रधान मोदी यांनी संबंधित नेत्यावर कारवाई करायला पाहीजे. शिवराज पाटील यांनी मुंबई येथील आतंकवादी हल्ल्यानंतर फक्त कपडे बदलले म्हणून राजीनामा दिला होता. अशोक चव्हाण यांनी सुध्दा घोटाळ्याचे आरोप होताच राजीनामा दिला. त्यामुळे निदान नैतिकतेच्या आधारावर तरी एफस्टीन प्रकरणात राजीनामा देणे गरजेचे असून कुणाचेही नाव समोर आल्यास त्याचेवर कठोर कारवाई करण्याची मागणी वसंतराव पुरके यांनी केली.**

# छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवा निमित्त भव्य बॉडी बिल्डिंग स्पर्धा उत्साहात संपन्न !

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



टायगर ग्रुप पुसद यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय भव्य बॉडी बिल्डिंग स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. स्पर्धेत उत्कृष्ट शरीरसौष्ठव सादर करत रविकांत केराम यांनी "टायगर पुसद श्री" हा मानाचा किताब पटकावला.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे राज्य मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनिलभाऊ नाईक यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रीय टायगर ग्रुप अध्यक्ष पै. तानाजी भाऊ जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच टायगर ग्रुप पदाधिकारी पै उमेशभाऊ पोखरकर, सोनुभाऊ वाटमारे यश भाऊ खराटे माहूर नयनभाऊ लुंगे यवतमाळ बाळूभाऊ जाधव, ईश्वर साने, दीपक लामतुरे, आधारस्तंभ राजूभाऊ सोळंके पाणीपुरवठा सभापती न प पुसद यांच्यासह मार्गदर्शक म्हणून विजयभाऊ जाधव व कौस्तुभभाऊ धुमाळे,नानाभाऊ बेले,धनंजयभाऊ सोनी, डॉ.रवींद्र वडते, श्री अभिजित पानपाट्टे बांधकाम सभापती न. प,श्री सुधीर भाऊ राठोड,अमितभाऊ आडे,श्री विठ्ठल खडसे सर शिक्षण सभापती न. प, श्री बबलू भाऊ माळघाने श्री अंकुश भाऊ भलगे उपस्थित होते.

स्पर्धेचे यशस्वी आयोजन श्री. युवराज कांबळे,पै.विष्णू गुद्धटवार, बालू ठाकूर, सागर चव्हाण, गोलू गायकवाड, विजय कोरडे, गजानन पाईकराव, सुनिल पवार आणि ओंकार जोगदंड यांच्या परिश्रमातून पार पडले. स्पर्धेला परिसरातील क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमातून युवकांमध्ये आरोग्य, शिस्त आणि व्यायामाची आवड वाढीस लागेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## लग्नानंतर तीन महिन्यांतच विवाहितेची आत्महत्या : सासरच्या छळाला कंटाळून टोकाचे पाऊल

पुणे शहरातील बाणेर परिसरात हुंड्यासाठी छळ केल्याच्या आरोपावरून एका नवविवाहितेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. लग्नानंतर अवघ्या तीन महिन्यांत २७ वर्षीय गंगा तेजस बेंबळकर हिने राहत्या इमारतीवरून उडी मारून जीवन संपवले. या प्रकरणी पतीसह सासरच्या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत. मृत तरुणीचे वडील शरणकुमार मल्लिकार्जुन माशाळ यांनी चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, पती तेजस शिवा बेंबळकर, सासू उज्ज्वला शिवा बेंबळकर, सासरे शिवा माणिकराव बेंबळकर आणि नणंद रिया शिवा बेंबळकर यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी हे कर्नाटकातील कलबुर्गी येथील प्राध्यापक असून, त्यांनी मुलीच्या लग्नासाठी मोठा खर्च केल्याचे पोलिसांनी सांगितले.

फिर्यादीनुसार, साखरपुड्यापासूनच वादाला सुरुवात झाली होती. स्थळ पाहणीच्या वेळी वरपक्षाने कोणतीही मागणी नसल्याचे सांगितले होते. मात्र, साखरपुड्यावेळी वधूपक्षाने दिलेल्या आहेरावरून पाहुण्यांसमोर अपमान करण्यात आला. आहेर कमी प्रतीचा असल्याची टीका करण्यात आली, असे फिर्यादीत म्हटले आहे. वधूपित्याने मुलीच्या भविष्यासाठी स्वतःचा प्लॉट विकून महागडे मंगल कार्यालय बुक केले होते. विवाहासाठी मोठ्या प्रमाणात पाहुण्यांची व्यवस्था केली असतानाही, वरपक्षाने कार्यक्रमस्थळ पसंत नसल्याचे सांगत नाराजी व्यक्त केली. पाहुण्यांसाठी सोयी नसल्याचा मुद्दा उपस्थित करत अपमानास्पद वक्तव्ये करण्यात आली. लग्नाच्या दिवशीही किरकोळ कारणावरून वर उशिरा मंडपात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

## संक्षीप्त

### धोबी (परीट) समाज महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी राजेन्द्र गायकवाड यांची निवड

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : विरेंद्र चव्हाण

मोहदा : मोहदा येथील एक प्रतिष्टित नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते



म्हणून ओळख असलेले राजेंद्र माधवराव गायकवाड यांची धोबी (परीट) समाज महासंघ (सर्व भाषिक ) यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. समाजा तर्फे ही निवड सामाजिक बांधिलकी, नेतृत्व कौशल्य आणि समाजाच्या सर्वांगिन विकासासाठी के लेल्या कार्याची पावती म्हणून करण्यात आली. या निवडीचे श्रेय संस्थापक अध्यक्ष डी. डी. सोनटक्के, जिल्हाध्यक्ष प्रकाश क्षिरसागर व आपल्या समाज बांधवांना दिले. उपाध्यक्ष म्हणून मी समाजाच्या न्याय हक्कासाठी आणि विविध सामाजिक शैक्षणिक योजना, समाजातील समस्या सोडविणे, सामाजिक एकता, तरुण पिढीला दिशा देने, समाजातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील राहील असे मत त्यांनी वक्त केले.



### आशिष काळबांडे यांची सरपंच संघटना पुसद तालुका अध्यक्ष पदी निवड

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : विजय निखाते

पुसद तालुक्यामधील सरपंच संघटनेची दिनांक 23. 2 .2026 रोजी विश्रामगृह पुसद येथे सभा घेण्यात आली या सभेमध्ये अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली यामध्ये अध्यक्षांच्या कार्यकाळ व कारभार यावर हितगुज चर्चा झाली. मागील अध्यक्षांनी कोणत्याच विषयांमध्ये पुढाकार घेऊन संघटनेला चालना दिली नाही. किंवा कुठल्याही मागण्यांना न्याय दिला नाही. ते सरपंच भवन असो, विहिरीचा विषय असो, गोठ्यांचा विषय असो, घरकुल विषय असो किंवा प्रशासकाचा विषय असो सर्व कारभार ढेपाळला होता. याच कारणाने सरपंच संघटनेचे अध्यक्ष प्रदीप देशमुख यांचा पायउतारा करून पुनश्च आशिष भाऊ काळबांडे यांनाच अध्यक्षपदावर विराजमान करण्यात आले. यापूर्वी आशिष काळबांडे यांनी वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला होता. पुनश्च त्यांना अध्यक्ष या पदावर नेमण्यात आले यावेळेस उपस्थितांमध्ये 65 सरपंच असून सर्वच सरपंचांनी एकमुखाने आशिष काळबांडे अध्यक्ष पदी व रणवीर पाटील हे उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्ष भाषणामध्ये आशिष काळबांडे यांनी सर्व सरपंचांना राहिलेली उर्वरित कामे आपण पंचायत समिती मार्फत व मंत्री महोदय इंद्रनील नाईक यांच्या सहकार्याने पूर्ण करून अशी आश्वासन त्यांनी सर्व सरपंचना दिले व जी संघटनेला कीड लागली होती ती दूर करून नवीन जोशाने काम करू असे सांगितले. यापूर्वी सुद्धा अनेक आंदोलन आशिष काळबांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. याच कारणाने सर्व सरपंचांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे व आपल्या कामे आता पूर्ण होतील अशी अपेक्षा सर्वांमध्ये जागृत झाली आहे.

### बारावी परीक्षा केंद्रावर थेट लाऊडस्पीकरवरून सांगितली उत्तरे

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील दहेली तांडा (ता. किनवट) येथे बारावीच्या जीवशास्त्र, इतिहासाच्या परीक्षेदरम्यान प्रश्नांची उत्तरे थेट स्पीकरद्वारे विद्यार्थ्यांना सांगितल्याचा प्रकार बुधवारी (२५ फेब्रुवारी) उघडकीस आला. स्व. संगीतादेवी उच्च माध्यमिक विद्यालय आश्रमशाळा येथील परीक्षा केंद्र क्रमांक २०७ वर ही धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी अज्ञाताविरुद्ध सिंदखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर लातूर शिक्षण मंडळाने नोटीस देऊन संस्थेकडून लेखी खुलासा मागवला आहे, अशी माहिती मंडळाच्या सचिव अनुपमा भंडारी यांनी दिली. परीक्षा केंद्राच्या संरक्षण भिंतीलगत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या इमारतीवर अज्ञात व्यक्तीने भोंगा लावला होता. त्यावरून अज्ञात व्यक्तीने वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना सांगितल्याचे समोर आले. केंद्र संचालक सुबोध थोरात यांनी घटनास्थळी पाहणी करून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर थोरात यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिंदखेड पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध (गुरनं १७/२६ नुसार) महाराष्ट्र गैरप्रकार प्रतिबंधक कायदा १९८२ च्या कलम (३) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दहावीच्या इंग्रजी विषयाची परीक्षा २७ फेब्रुवारी रोजी झाली. त्यात कॉपी करताना तिघे जण आढळून आले. यात एक विद्यार्थी लातूर जिल्ह्यातील तर दोघे नांदेड जिल्ह्यातील असल्याचे लातूर शिक्षण मंडळाच्या वतीने सांगण्यात आले. या तिघांनाही निलंबित करण्याची प्रक्रिया सुरू असून संबंधित प्रकरणांची स्वतंत्र चौकशी केली जात आहे.

### नागपुरात मोकाट वळूचा उपद्रव : महिलेला धडक देवून केले जखमी

नागपूर शहरात भटक्या कुत्र्यांच्या त्रासानंतर आता मोकाट सांडांचा उपद्रव



वाढला आहे. येथील सन्मान नगर परिसरात २७ जानेवारी रोजी सकाळी एका ६४ वर्षीय महिलेवर मोकाट सांडाने हल्ला केला. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, वंदना देवीकर (वय ६४) या सकाळी साडेसात वाजता आपल्या घरासमोर रस्ता झाडत असताना अचानक एका मोकाट सांडाने त्यांच्यावर हल्ला केला. सांडाने त्यांना जोरदार धडक देऊन जमिनीवर आपटले आणि शिंगांनी भोसकले. हा हल्ला इतका अचानक होता की शेजाऱ्यांना मदतीला धाव घेण्याची संधीही मिळाली नाही. आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेतली आणि सांडाला हुसकावून लावले. गंभीर जखमी अवस्थेत देवीकर यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीत त्यांच्या बरगड्या व हातापायांची हाडे मोडल्याचे निष्पन्न झाले. डोक्याला जबर मार लागल्याने त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली आहे. देवीकर यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. त्या जवळपास तीन आठवडे अतिदक्षता विभागात मृत्यूशी झुंज देत होत्या. सध्या त्या घरीच उपचार घेत असून, कृत्रिम ऑक्सिजनच्या सहाय्याने त्यांची प्रकृती स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान, हल्ला करणारा सांड अजूनही त्याच परिसरात मोकाट फिरत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिला घराबाहेर पडताना घाबरत आहेत. नागरिकांनी महानगरपालिकेच्या जनावर पकडणाऱ्या पथकाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# लाखपुरी येथे शेतातून ४२ हजारांची तूर चोरी

## ठाणेदारांसह पोलिसांची घटनास्थळी पाहणी

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

मुर्तिजापूर : लाखपुरी शिवारातील शेतातून ४२ हजार रुपये किमतीची तूर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणी मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. तक्रारदार पुरुषोत्तम केशवराव धनमुळे (वय ५७, रा. लाखपुरी) यांची गट क्रमांक १७० मध्ये सुमारे ७ एकर शेती आहे. त्यांनी शेतात सोयाबीन व तूर पिकाची लागवड केली होती. तूर काढणीनंतर सुमारे एक हजार पेंड्यांची गंजी लावण्यात आली होती.

दि. २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळपर्यंत सर्व पेंड्या सुरक्षित होत्या. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी शेतात गेल्यानंतर गंजीतील सुमारे ३०० पेंड्या तूर चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. चोरीस गेलेली तूर अंदाजे ६ क्विंटल असून बाजारभावानुसार तिची किंमत सुमारे ४२ हजार रुपये आहे. घटनेची माहिती मिळताच मुर्तिजापूर ग्रामीणचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांनी स्वतः पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. परिसराची पाहणी करून पुरावे संकलित करण्यात आले असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ठाणेदार श्रीधर गुट्टे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, "घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून तपास सुरू आहे. परिसरातील माहितीदारांकडून व तांत्रिक साधनांच्या मदतीने आरोपींचा शोध घेतला जात आहे. लवकरात लवकर आरोपींचा शोध घेण्यात आम्हाला यश येईल." दरम्यान, ग्रामीण भागात शेतमाल चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांनी गस्त वाढवून आरोपींना जेरबंद करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



## 8 वर्षीय दिव्यांग मुलीवर पित्याकडून अत्याचार

### गुन्हा लपवल्याप्रकरणी आजोबांनाही अटक, आईच्या तक्रारीनंतर कारवाई

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

नागपुरात एका ८ वर्षीय दिव्यांग मुलीवर तिच्याच पित्याने लैंगिक अत्याचार केल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणात मुलीच्या आजोबांनीही साथ दिल्याचा आरोप आहे. पीडितेच्या आईच्या तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपी पिता आणि आजोबा या दोघांनाही अटक केली आहे. मानकापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली आहे.

मानकापूरचे पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या आईने तक्रार दाखल केल्यानंतर गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी याप्रकरणी पिता आणि आजोबा या दोन्ही आरोपींना तात्काळ अटक केली आहे. पीडित मुलीच्या आईने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, तिचा ४१ वर्षीय पती गेल्या वर्षी जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत आपल्या ८ वर्षांच्या दिव्यांग मुलीवर सतत अत्याचार करत होता. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पिता मुलीला अश्लील व्हिडिओ दाखवून तिच्यासोबत अश्लील चाळे आणि दुष्कृत्य करायचा. पीडितेच्या आईने या कृत्याला विरोध केला असता, आरोपी पतीने तिला मारहाण करून याबाबत कोणालाही न



सांगण्याची धमकी दिली. यानंतर आईने ही बाब आपल्या ७० वर्षीय सासऱ्यांच्या (मुलीचे आजोबा) कानावर घातली. परंतु, सासऱ्यांनी कोणतीही मदत न करता, "ती त्याची मुलगी आहे, तो काहीही करेल" असे म्हणत, कुणाला काही सांगितल्यास माय-लेकीला गायब करण्याची धमकी दिली. अखेर, आईने मानकापूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

## लाडकी बहीण योजनेमुळे इतर खात्यांवर ताण?

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

विधानपरिषदेत काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी केलेले वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा उल्लेख करताना नाईक यांनी सांगितले की, राज्य शासनाने गेल्या वर्षभरात अनेक प्रकल्प सुरू केले असून त्यामध्ये या योजनेलाही मान्यता देण्यात आली आहे. मात्र या योजनेमुळे इतर खात्यांवर ताण निर्माण होण्याची परिस्थिती तयार होत असली तरी ती योजना बंद होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे सभागृहात चर्चा रंगली.

सतेज पाटील यांनी धनगरवाडे आणि आदिवासी पाड्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले.



कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी, राधानगरी, गगनबावडा या भागांत अनेक धनगरवाडे जंगल परिसरात असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री गावांना जोडण्यासाठी सिमेंट काँक्रिटचे रस्ते करण्याबाबत बोलत आहेत, तर धनगरवाडे जोडण्यासाठी विशेष मोहीम राबवता येईल का, असा प्रश्न त्यांनी विचारला. नुकतीच तीन किलोमीटर अंतरावरून एका रुग्णाला खांद्यावरून नेण्याची वेळ आल्याची बातमी त्यांनी सभागृहात मांडली. अशा परिस्थितीत वन विभागाने पुढाकार घेऊन काही उपाययोजना कराव्यात का, असा थेट सवाल त्यांनी केला. यावर उत्तर देताना गणेश नाईक यांनी वनविकास महामंडळ स्थापनेपासून करण्यात आलेल्या साग लागवडीचा उल्लेख केला. कापणीसाठी उपलब्ध असलेली सागाची संपत्ती सुमारे बारा हजार कोटी रुपयांची असल्याचे त्यांनी सांगितले. या संपत्तीच्या आधारे एखाद्या बँकेकडून सुमारे सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा प्रस्ताव अधिकाऱ्यांना दिल्याचे त्यांनी सांगितले. जंगल व्यवस्थापनात झाडांची विरळणी करताना मिळणाऱ्या लाकडातून कर्जावरील व्याज फेडता येऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. या निधीमुळे वन खात्याच्या अनेक प्रलंबित प्रश्नांना दिलासा मिळेल, असा त्यांचा दावा होता.

## कर कमी करण्यासाठी 3500 रुपयांची मागणी

नागपूर : महानगरपालिकेच्या हनुमान नगर (झोन क्र. ३) येथील राजस्व निरीक्षक प्रमोद वसंतकुमार मोगरे (५०) आणि खाजगी व्यक्ती राकेश नरेंद्र दोडके (३४) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ३,००० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. ४,५०० रुपयांचा मालमत्ता कर कमी करण्यासाठी ही लाच मागण्यात आली होती.

तक्रारदाराने रामेश्वरी परिसरात एक फ्लॅट खरेदी केला होता. या फ्लॅटचा कर स्वतःच्या नावावर करण्यासाठी त्यांनी हनुमान नगर झोन कार्यालयात आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. कागदपत्रांच्या पडताळणीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांपैकी राकेश दोडके याने तक्रारदाराला सांगितले की, त्यांना दरवर्षी ४,५०० रुपये कर भरावा लागेल. हा कर १,८०० रुपयांपर्यंत कमी करण्यासाठी त्याला आणि त्याचे वरिष्ठ प्रमोद मोगरे यांना ३,५०० रुपये द्यावे लागतील, अशी मागणी दोडकेने फोनद्वारे केली. या मागणीनंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. एसीबीने सापळा पडताळणी केली असता, ३,५०० रुपयांऐवजी तडजोडीनंतर ३,००० रुपये स्वीकारण्याचे निश्चित झाले. त्यानुसार, रचलेल्या सापळ्यात आरोपी राकेश दोडके याला प्रमोद मोगरे यांच्या सांगण्यावरून ३,००० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध हुडकेश्वर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ आणि ७ अ अन्वये गुन्हा दाखल केला.

## विना क्रमांकाच्या दुचाकीवरून होणारी गावठी दारूची तस्करी उघड

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर पोलीस स्टेशन अंतर्गत विरली बु. परिसरात अवैध दारू तस्करी करणाऱ्या एका इसमाला पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. या कारवाईत पोलिसांनी विना क्रमांकाची दुचाकी आणि मोठ्या प्रमाणात देशी दारू असा एकूण ९४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी लाखांदूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी विरली परिसरात शासकीय कामासाठी गेले असताना, त्यांना एका इसमाबाबत गुप्त माहिती मिळाली. 'एक व्यक्ती लाल-काळ्या रंगाच्या दुचाकीवरून अवैध दारूची वाहतूक करत आहे' अशी माहिती मिळताच पोलिसांनी दोन पंचांसह विरली बु. येथील आंबेडकर चौक परिसरात सापळा रचला, दुपारी २:४० वाजताच्या सुमारास संशयित इसम विना क्रमांकाच्या हिरो एच.एफ. डिलक्स दुचाकीने येताना दिसला. पोलिसांनी त्याला अडवून विचारपूस केली असता, त्याने आपले नाव नरेश शंकर गभणे (वय ४५ वर्ष, रा. धामणी, जि. भंडारा) असल्याचे सांगितले. पोलिसांनी दुचाकीच्या टाकीवर ठेवलेल्या कापडी पिशवीची झडती घेतली असता, त्यात धक्कादायक बाबी समोर आल्या, 'टायगर ब्रँड' देशी दारूच्या ९० मिलीच्या १०० सीलबंद बाटल्या (किंमत ४,००० रु.), विना क्रमांकाची हिरो एच.एफ. डिलक्स गाडी (किंमत ९०,००० रु.) असा एकूण ९४,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीकडे दारू वाहतुकीबाबत कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाल्याने, पोलिसांनी दारूचे नमुने रासायनिक परीक्षणासाठी जप्त केले आहेत. आरोपी नरेश गभणे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस हवालदार संतोष चव्हाण, पोलीस शिपाई ओंकार सपाटे आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

## घरफोड्या करणाऱ्या दोघांना कोंढवा परिसरातून अटक

पुणे : पोलिसांनी घरफोड्या करणाऱ्या दोन चोरट्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने आणि मोबाईल फोनसह सुमारे २ लाख ८३ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. ही कारवाई कोंढवा परिसरातून करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे वैभव उर्फ बाब्या संजय गायकवाड आणि प्रशांत उर्फ चिक्या भारत कसबे (रा. साठेनगर, तरवडे वस्ती) अशी आहेत. त्यांच्यावर कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. काळेपडळ पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. पोलीस अंमलदार अतुल पंधरकर आणि गिरीराज जगदाळे यांना बातमीदाराकडून आरोपींबाबत माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने दोघांना कोंढवा परिसरातून ताब्यात घेतले.

# अमरावतीत टाऊन हॉलच्या जागेवर होणार नाट्यगृह

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

अमरावती : शहराच्या सांस्कृतिकतेची ओळख असलेल्या येथील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक नाट्यगृहाची दुरुस्ती आणि मनपा टाऊन हॉलच्या जागेवर नवे नाट्यगृह साकारणार असल्याचे प्रतिपादन महापौर श्रीचंद तेजवानी यांनी येथे केले. येथील पीडीएमसी परिसरातील सुसज्ज अशा छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात आज, गुरुवारपासून राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेची अंतीम फेरी सुरु झाली. या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. माजी महापौर तथा सभागृह नेते चेतन गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला अ. भा. नाट्य परिषद या मध्यवर्ती संस्थेचे विश्वस्त ॲड. प्रशांत देशपांडे, बाल रंगभूमीचे अध्यक्ष मंगेश



बक्षी, सांस्कृतिक संचालनालयाचे वसंतराव खडसे, गोविंद देशपांडे परीक्षक जुईताई बर्वे, संजय पाटील, श्याम शिंदे, सुरेश गांगुर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

तेजवानी पुढे म्हणाले, अमरावती शहराची ओळख ही विदर्भाची सांस्कृतिक राजधानी म्हणून केली जाते, हे मला ठाऊक आहे. त्यामुळे शहराच्या मध्यभागी उपलब्ध असलेल्या मनपा टाऊन हॉलच्या जागेवर सर्वांना परवडेल, अशा पद्धतीचे नाट्यगृह असावे, ही शहरवासियांची असलेली मागणी पूर्ण करण्याच्यादृष्टीने मी प्रयत्न करणार आहे. याशिवाय सांस्कृतिक भवनाचे खराब झालेले फ्लोरींग, तेथील प्रकाश व्यवस्था आणि ध्वनी व्यवस्था याचीही दुरुस्ती केली जाणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद येत्या अर्थसंकल्पात केली जाईल, असेही त्यांच्यावतीने सांगण्यात आले. प्रारंभी प्रास्ताविकाच्या माध्यमातून अखिल भारतीय नाट्य परिषद या साहित्य क्षेत्रातील मध्यवर्ती संस्थेचे विश्वस्त ॲड. प्रशांत देशपांडे व परिचयपर माहितीदरम्यान नाट्य परिषदेचे शाखाध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले यांनी हा मुद्दा मांडला होता. मनपातील सभागृह नेते माजी महापौर चेतन गावंडे यांनीही यावेळी या बाबीला उजाळा देण्याचे मान्य केले. अध्यक्षीय संबोधन करताना ते म्हणाले, येत्या काळात अमरावती शहरातील कलावंतांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध असावे म्हणून येथे नाट्यगृह असणे आवश्यक आहे. त्यासाठी नगरसेवक तसेच नाट्य परिषदेचा एक सदस्य म्हणून माझ्यातर्फे सतत पाठपुरावा केला जाईल. राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेची अंतीम फेरी पहिल्यांदाच अमरावतीत होत आहे. या निमित्ताने आठवडाभरात राज्यातील अनेक बालकलावंत याठिकाणी येणार आहेत. दररोज सहा ते सात याप्रमाणे एकूण ४३ नाटकांचे सादरीकरण या स्पर्धेत केले जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले. संचालन ॲड. चंद्रशेखर डोरले यांनी केले. आभार नाट्य परिषदेचे सहकार्यवाह मिलींद कहाळे यांनी मानले. कार्यक्रमाचा प्रारंभ नटराजांचे पूजन व महाराष्ट्र गीताने झाला. स्वा शाखेचे कोषाध्यक्ष सुरेश बारसे, प्रा. एमटी नाना देशमुख, विराग जाखड, प्रसन्न देशमुख, सागर रघुवंशी, अभिजीत देशमुख, ॲड. श्रद्धा पाटेकर, विशाल फाटे, हर्षद ससाने, अनुराधा रघुवंशी, निलीमा लोडम, डॉ. श्याम देशमुख यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यशस्वीतेचा सत्कार मनपा निवडणुकीत अ.भा. नाट्य परिषदेचे विश्वस्त ॲड. प्रशांत देशपांडे, स्थानिक शाखेच्या पदाधिकारी डॉ. मधुरा कहाळे, सहयोगी सदस्य विदर्भ केसरी प्रा. डॉ. संजय तिरथकर हे नगरसेवक म्हणून विजयी झाल्याबद्दल त्यांचा शाल, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन यावेळी सत्कार करण्यात आला. याशिवाय सदर स्पर्धेत प्रेक्षक म्हणून विद्यार्थ्यांना सतत सहभागी करणारे राधानगरातील प्रगती विद्यालयाचे मुख्याध्यापक शहाळे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

दैनिक विदर्भ केसरी TODAY
विदर्भाचा मानबिंदू

# गडचिरोली

GOOD MORNING

## बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू: वाघोली येथील २२ वर्षीय तरुणाचा अपघाती मृत्यू

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी




पुणे-नगर रस्त्यावर वाघोली परिसरात एका भरधाव प्रवासी बसच्या धडकेत २२ वर्षीय दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना २६ फेब्रुवारी रोजी रात्री आठच्या सुमारास घडली. या प्रकरणी वाघोली पोलिसांनी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मृत्यू झालेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव तुषार दत्तात्रय लोंढे (वय २२, रा. आनंदनगर, वाघोली) असे आहे. या प्रकरणी तुषारचा मित्र साई हरिभाऊ लोंढे (वय २१, रा. आनंदनगर, वाघोली) याने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुषार लोंढे हा २६ फेब्रुवारी रोजी रात्री आठच्या सुमारास नगर रस्त्यावरून दुचाकीने जात होता. वाघोली परिसरात एका भरधाव प्रवासी बसने त्याच्या दुचाकीला धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या तुषारला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अपघातानंतर बस चालक घटनास्थळावरून पसार झाला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पोलीस उपनिरीक्षक थोरात या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## संक्षिप्त



### रंगय्यापल्ली अंगणवाडी क्र. २ मध्ये बांधण्यात आलेले शौचालय शोभेची वस्तू

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : लक्ष्मीनारायण आडेटी

सिरोंचा : सिरोंचा तालुक्यातील रंगय्यापल्ली गावातील अंगणवाडी क्र. २ साठी बांधण्यात आलेले शौचालय सध्या पाण्याअभावी वापरात नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेले हे शौचालय प्रत्यक्षात उपयोगात येत नसल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. स्थळ पाहणी केली असता शौचालयाला पाण्याची कोणतीही कायमस्वरूपी सोय नसल्याचे दिसून येते. नळजोडणी, पाईपलाईन किंवा पाण्याची टाकी यांची व्यवस्था करण्यात आलेली नाही. परिणामी लहान मुलांना व अंगणवाडी सेविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्वच्छ भारत अभियान आणि बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शौचालयाची उभारणी करण्यात आली असली, तरी मूलभूत पाणी पुरवठ्याविना ते निष्प्रभ ठरत आहे. ग्रामस्थांनी संबंधित विभागाने तात्काळ पाणीपुरवठ्याची व्यवस्था करून शौचालय कार्यान्वित करावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा उच्च अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, या कामासाठी किती निधी खर्च झाला व पाणीपुरवठ्याची तरतूद का करण्यात आली नाही, याबाबत चौकशी करण्याची मागणी होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व पंडित दीनदयाल उपाध्याय वसतिगृह योजनेतंर्गत प्रवेशासाठी मुदतवाढ..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

चंद्रपूर : शैक्षणिक सत्र 2025-26 करिता इतर मागास प्रवर्गातील मुला/मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुला-मुलींच्या वसतिगृहांमध्ये तसेच आधार व स्वयंम योजनेंतर्गत 12 वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. शासनाच्या https://hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर शासकीय वसतीगृह असलेल्या जिल्ह्यासाठी पंडित दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी 12 वी नंतरच्या व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी 10 मार्च 2026 पर्यंत ऑनलाईन अर्ज भरून अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे, संबंधीत वसतिगृहास विहीत मुदतीत सादर करावी. तसेच शासकीय वसतीगृहासाठी पात्र असलेल्या तथापि गुणवत्तेनुसार व वसतीगृहाच्या क्षमतेअभावी वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडित दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फूले आधार योजनेसाठी विचारात घेतले जातील. शासकीय वसतीगृह उपलब्ध नसलेल्या जिल्ह्यासाठी पंडित दिनदयाल स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फूले आधार योजनांचे अर्ज http://hmas mahait.org या पोर्टलवर भरून ऑनलाईन भरलेला अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधीत वसतिगृहास विहीत मुदतीत सादर करावी. अधिक माहितीकरीता इमाव विमाप्र व विजाभज मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह चंद्रपूर येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. सचिन मडावी यांनी केले आहे.

# सन 2017-18 पासुन नरेगा अंतर्गत झालेल्या कुशल कामाची देयके 8 वर्ष होवूनही थकितच..!

## संजय चरडुके यांचे कुटुंबासमवेत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : सन 2017-18 पासुन नरेगा अंतर्गत झालेल्या कुशल कामाची देयके 8 वर्ष होवूनही आजतागायत न मिळाल्यामुळे संजय चरडुके यांनी आपल्या कुटुंबासह नरेगा अंतर्गत झालेल्या कुशल कामाची देयके त्वरीत देण्यात यावी याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसुन मागणी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की सन 2016-17 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार केंद्राकडून नरेगा योजनेसाठी येणारी अब्जो रूपयाची निधी वापस जात असल्यामुळे ती वापस जावू नये याकरिता राज्य शासनाने नरेगा मधून कुशल कामे, जसे कॉक्रीट रस्त्याची व इतर कुशल कामे नियोजनात संभाविष्ठ करून ग्रा.पं. वै यंत्रणा स्तरावर करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे आरमोरी पंचायत समिती स्तरावर सुध्दा अशी कुशल कामे करून देयके नरेगाच्या वेबसाईट वर अपलोड सुध्दा करण्यात आली होती. निधीची वाट पाहण्यात काही काळ लोटला होता. परंतु त्यानंतर राज्यात कुठेतरी "काम न झालेल्या बांधकामाची बिल नरेगाच्या वेबसाईटवर अपलोड केल्या गेली" असा प्रश्न विधानसभे मध्ये सदस्याकडून विचारल्या गेला होता. त्यामुळे शासनाकडून तशा प्रकारचे चौकशीचे आदेश प्रत्येक बांधकाम "उपविभागाला देण्यात आले होते. वडसा उपविभागीय अधिकारी यांना सुध्दा पत्र आले होते. परंतु उपविभागीय अधिकारी वडसा जि.प. बांधकाम




विभाग यांनी 2 वर्ष कोणतीही चौकसी केली नाही. व लाभार्थ्यांची तथा वस्तु पुरवठा धारकांची पैसे मागण्यासाठी वाट पाहत राहिले. ज्या वस्तु पुरवठा धारकांनी पैसे दिले नाही त्यांच्या कामाचा अहवाल नकारार्थी व ज्यांनी पैसे दिले त्यांचा अहवाल होकारार्थी टिपन्या लिहुन चक्क 2 वर्षानंतर शासनाकडे पाठविला.

त्यामुळे हे प्रकरण लाभार्थ्यांच्या व पुरवठा धारकांच्या लक्षात येताच त्यांच्याकडून तशी तक्रार मा. मु.का.अ. जिल्हापरिषद गडचिरोली यांचे कडे करण्यात आली. परंतु यावर 2 वर्ष कोणतीही कार्यवाही केल्या गेली नाही. त्यानंतर त्यांनी माजी खासदार डॉ. अशोकजी नेते यांचेकडे हि समस्या ठेवली. त्यावेळी मा. डॉ. अशोक नेते यांनी दिलेल्या पत्रामुळे प्रशासनास जाग येवून जि.प.नरेगा विभागाचे तत्कालीन डेप्टी CEO चौव्हान आणि कार्यकारी अभियंता होळकर यांनी प्रत्यक्षात साईटवर येवून चौकशी केली, तेव्हा त्यांना प्रशासनाची चुक लक्षात आली. व त्यांनी चुकीची दुरूस्ती केली जाईल असे सांगितले. अशाप्रकारे पुन्हा एकदा चौकशी होवून खुप काळ लोटला आहे. तरी देयके मिळण्याबाबत अजून पर्यंत समाधानकारक कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे 8 वर्ष होवूनही 1 करोड रूपयाची देयके अजून पर्यंत न मिळाल्यामुळे सदर लाभार्थी व पुरवठा धारकांचे खुपमोठे आर्थिक नुकसान होवून त्यांचे कुटूंब रस्त्यावर आलेले आहे.

■ सदर लाभार्थी व पुरवठा धारकांकडून मा. मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांना गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने तात्काळ प्रश्न निकालात काढून 10 दिवसाच्या आत देयके व्याजासह देण्याची कार्यवाही करावी. तसेच संबधीत जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करुन न्याय मिळवून द्यावा याकरीता निवेदन देण्यात आले आहे.

# पद्मापूर जंगल नर्सरीत तीन दिवसानंतर सापडला वृद्ध महिलेचा मृतदेह...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

ब्रह्मपुरी : २७/०२/२६ ब्रह्मपुरी तालुक्यातील भुज बिटामध्ये येत असलेल्या पद्मापूर येथील जंगलातील नर्सरी मध्ये झाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या कुसऱ्या गवत कापून आणण्यासाठी गेलेल्या यमुना बाजीराव मडावी (वय वर्ष - ७०) या महिलेवर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना तब्बल तीन दिवसानंतर आज २७/०२/२६ रोजी सकाळी ०८ -०० वाजे दरम्यान उघडकीस आली आहे. सदर महिलेचा छीन्न- विछीन्न अवस्थेत असलेला मृतदेह पाहून वाघाने ठार केल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच ब्रह्मपुरी वन विभाग घटनास्थळी दाखल होऊन घटनेचा पंचनामा केला व उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय ब्रह्मपुरी येथे मृतदेह पाठविण्यात आला. तात्पुरते सानुग्रह अनुदान म्हणून मृत यमुना बाजीराव मडावी यांच्या कुटुंबीयांना रुपये- २,२५०००/- ( दोन लाख पंचवीस हजार रुपये) देण्यात आले. उर्वरित रक्कम चौकशी अंतिम त्यांना देण्यात येईल असे वनाधिकारी यांनी सांगितले.


मृतक महीलेला दोन अपत्य असल्याने तिच्या मृत्यूमुळे गावात हळहळ व्यक्त केल्या जात असून पद्मापूर ,भुज,मुडझा, एकारा या परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. सदर नरभक्षी वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा अशी या परिसरातील नागरिकांची वनविभागाला मागणी आहे. सदर नरभक्षी वाघावरती वनविभागाची देखरेख सुरू असून त्याला पकडण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत असे वन विभागाच्या वतीने सांगण्यात येत आहे.



# गोठणगाव तलाठी सुलोचना कन्नाके एसीबीच्या जाळ्यात!

## ५०० रुपयांच्या लाचेसाठी रंगेहात पकडले

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे



कुरखेड़ा : गडचिरोली जिल्ह्यातील गोठणगाव (साजा) येथील महसूल तलाठी सुलोचना कन्नाके २६ फेब्रुवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) जाळ्यात अडकली आहे. प्राप्त माहितीनुसार, एका वन पट्टाधारक शेतकऱ्याकडून त्याच्या शेतीची ७/१२ उतारा इपीक नोंद करून निर्गमित करण्यासाठी ५०० रुपयांची लाच मागितली होती. शेतकऱ्याची लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी लगेच गडचिरोलीच्या लाचलुचपत विभागाशी संपर्क साधला. विभागाने त्वरित सापळा रचला. तलाठीने लाच मागणी करून ती स्वीकारताच रंगेहात पकडण्यात आली. सापळा यशस्वी ठरल्यानंतर तिच्याविरोधात कुरखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. लाचलुचपत विभागाच्या सूत्रांनी सांगितले की, ही कारवाई महसूल विभागातील भ्रष्टाचारावर लगाम बसवण्यासाठी महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांच्या छोट्या-छोट्या कामांसाठीही लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यांवर अशा कारवाया सुरू राहतील, असा इशारा विभागाने दिला आहे. या घटनेने गोठणगाव आणि परिसरातील शेतकरी वर्गात खळबळ उडाली असून, महसूल यंत्रणेतील पारदर्शकता आणि जबाबदारीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. अधिक तपास सुरू असून लवकरच न्यायालयीन प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

# आदिवासी विकास महामंडळाकडून शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार

## माजी आमदार कृष्णा गजबे यांच्या पाठपुराव्याला यश

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

आरमोरी : आरमोरी विधानसभा क्षेत्रातील आदिवासी शेतकऱ्यांसाठी आदिवासी विकास महामंडळाकडून (TDC) १० कोटी रुपयांचे चुकारे जमा होणार आहेत. माजी आमदार कृष्णा गजबे यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकामंत्री आशिषजी जयस्वाल जी यांच्याशी मुंबईत बैठक घेतली असता, शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी तात्काळ पावले उचलण्यात आली. माजी आमदार कृष्णा गजबे यांनी अन्न पुरवठा विभागाचे प्रधान सचिव यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर केले. यामध्ये शेतकऱ्यांचे थकीत पैसे तात्काळ खात्यात जमा करण्याची मागणी करण्यात आली होती. राज्याचे पालकमंत्री यांनी या मागणीला तात्काळ प्रतिसाद देत आदिवासी विकास महामंडळाला शेतकऱ्यांचे १० कोटी रुपये खात्यात जमा करण्याचे निर्देश दिले. आरमोरी विधानसभा क्षेत्रातील आदिवासी शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळेल. माजी आमदार गजबे यांच्या शेतकरी-केंद्रित भूमिकेचे स्थानिकांकडून कौतुक होत आहे.



# गडचिरोली येथे जिल्हास्तरावरील लोकशाही दिन ४ मार्च रोजी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : जिल्हास्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन बुधवार, दिनांक ०४ मार्च २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथील सभागृहात करण्यात येणार आहे. लोकशाही दिन हा नागरिकांना त्यांच्या वैयक्तिक तक्रारी थेट जिल्हास्तरावर मांडण्याची संधी उपलब्ध करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक व्हावा तसेच प्रलंबित तक्रारींवर त्वरित कार्यवाही व्हावी, या उद्देशाने दर महिन्याला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

ज्या तक्रारदारांना जिल्हास्तरावरील लोकशाही दिनात तक्रार अर्ज दाखल करावयाचा आहे, त्यांनी संबंधित तक्रार प्रथम तालुका स्तरावरील लोकशाही दिनात मांडलेली असणे आवश्यक आहे. तालुका स्तरावर तक्रारीचे निराकरण होऊन प्राप्त झालेल्या अहवालावर समाधान न झाल्यासच संबंधित तक्रारदारास जिल्हास्तरावर अर्ज सादर करता येईल. अर्जासोबत तहसिलदारांच्या उत्तराची प्रत तसेच तालुका लोकशाही दिनाचा टोकन क्रमांकाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

सदर अर्ज विहित नमुना प्रपत्र १ (ब) मध्ये भरून अर्जाची आगाऊ प्रत जोडून सादर करावा. तसेच तक्रार किंवा निवेदन हे वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक असून अन्य प्रकारचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना शासनाने निर्धारित केलेल्या सूचनांचे पालन करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज वेळेत सादर करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून लोकशाही दिनाच्या माध्यमातून त्यांच्या तक्रारींवर तातडीने व प्रभावी कार्यवाही करता येईल.

# नॅशनल हायवे 930 ला गती देण्यासाठी माजी खासदार डॉ. अशोकजी नेते यांची धानोरा दौऱ्या दरम्यान प्रत्यक्ष पाहणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

धानोरा : धानोरा दौऱ्यावर असताना माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी National Highway 930 या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय महामार्गाच्या सुरू असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करत सविस्तर आढावा घेतला. या महामार्गाच्या कामातील संथ गतीबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून कामाचा तपशील जाणून घेतला. धानोरा, मुरुमगाव, गडचिरोली, राजनांदगाव ते रायपूर या भागांना जोडणारा हा मुख्य मार्ग असून दररोज मोठ्या संख्येने मोटारगाड्या, मोटारसायकली, टॅक्सी, ट्रक व इतर वाहने या मार्गावरून प्रवास करतात. सध्या सुरू असलेल्या कामामुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. धूळ, खड्डे, तीव्र वळणे आणि अपूर्ण काम यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर मा. खा. डॉ. नेते यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी केळकर तसेच संबंधित कंत्राटदारांशी थेट संवाद साधत कामाची सद्यस्थिती जाणून घेतली. निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असतानाही कामाची गती मंद का आहे, याबाबत त्यांनी स्पष्ट विचारणा केली. काम संथगतीने होत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त करत, "नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड न करता कामाला तातडीने गती द्यावी. रस्त्याचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी आवश्यक ती सर्व यंत्रणा तत्काळ कार्यरत करावी," अशा स्पष्ट सूचना दिल्या. यावेळी वन्यजीव (वाइल्ड लाईफ) संबंधित अडचणींमुळे कामात अडथळे येत असल्याचे कारण पुढे करण्यात आले. मात्र, या अडचणींची योग्य दखल घेत प्रशासनाने आवश्यक परवानग्या व समन्वय साधून कामात कोणतीही कसर ठेवू नये, असेही डॉ. नेते यांनी ठामपणे सांगितले. "हा महामार्ग गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी जीवनवाहिनी ठरणार आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता राखत जलदगतीने पूर्णत्वास नेणे अत्यावश्यक आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. नेते यांच्या या प्रत्यक्ष पाहणीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून लवकरच कामाला अपेक्षित वेग मिळेल, अशी आशा निर्माण झाली आहे. यावेळी पाहणी दरम्यान भाजपा तालुकाध्यक्ष साजन गुंडावार, जिल्हा सचिव सारंग साळवे, सुभाष खोबरे, गजानन परचाके उपस्थित होते.

### अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत कामाचा सविस्तर आढावा ; दर्जेदार व जलद कामासाठी स्पष्ट निर्देश






## पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




खा... आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता... १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### न...
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातुर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा.

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**